शुध्द आरोग्यदायी चटकदार खडे मसाले
लवंग | काळीमिरी | हिरवी विलायची | मसाला विलायची | जावित्री
रामपत्री | जायफळ | खसखस | नाकेश्वर | त्रिफळा
सुंठ | जिरा | ओवा | बडीशोप | शहाजीरा
तमालपत्र | दगडफुल | कर्णफुल | हळकुंड | खोबरं
मिरची | तिळ | धने | दालचिनी | खडा हिंग/पावडर
उत्कृष्ट दर्जा माफक दर...
भूमी एजन्सीज
मिक्स खडा मसाला उपलब्ध
सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
Follow us @bhoomiagencies
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

स्नेह भोज
स्वाद दिल से दिल तक!
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. ०३.०९.२०२४ | अंक नं. १५७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



शहरातील रस्त्यांवर ठिकठिकाणी कचऱ्यांचे ढिगारे पडले असून, अस्वच्छता पसरली आहे. (छाया – धनेश कटारिया)



युनियन पदाधिकाऱ्यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मनपाच्या महिला कर्मचाऱ्यांनी उपोषणस्थळी केलेली मोठी गर्दी. (छाया – लहू दळवी)





राज्यभरातील एसटी कर्मचारी बेमुदत संपावर गेल्यामुळे नगरच्या तारकपूर आगारात उभ्या असलेल्या एस टी बसेस तर दुसऱ्या छायाचित्रात बसस्थानकात बसेस येण्याची वाट पाहत बसलेले प्रवाशी (छाया– लहू दळवी)

# सरकार आणि कर्मचाऱ्यांच्या वादात नागरिकांचे हाल

नगर – सातवा वेतन आयोग लागू करावा या मागणी साठी महापालिकेचे कर्मचारी गेल्या ८ –९ दिवसांपासून आंदोलन करत आहेत. मंगळवार पासून एसटी महामंडळाचे कर्मचारीही विविध मागण्यांसाठी संपावर गेले आहेत. हे दोन्ही विभाग नागरिकांना सेवा देणारे आहेत. मात्र त्यांच्या आंदोलनामुळे नागरिकांना सेवा मिळत नसल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

मनपा कर्मचाऱ्यांनी शहरातील साफ सफाई बंद केल्याने संपूर्ण शहरात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. शहरात अगोदरच डेंग्यू, चिकनगुनियाने व इतर साथीच्या आजारांनी थैमान घातलेले असताना आणि शहरातील रुग्णालयांमध्ये रुग्णांना जागा मिळत नसताना या कचऱ्यामुळे रोगराई आणखी वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. या शिवाय महापालिकेचे दैनंदिन कामकाज ठप्प असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

आता बससेवा विस्कळीत झाल्याने ग्रामीण भागातून शहरात येणारे आणि शहरातून ग्रामीण भागात जाणाऱ्या प्रवाशांचे हाल सुरु झाले आहेत. या दोन्ही विभागाच्या कर्मचाऱ्यांचे भांडण सरकारशी आहे. पण त्याचा त्रास सर्वसामान्यांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे सरकारने तातडीने या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत तोडगा काढावा आणि त्यांचे आंदोलन थांबवत सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे.

## शहरात साफसफाई ‘ठप्प’ ; सर्वत्र कचरा, घाणीचे साम्राज्य

७ वा वेतन आयोग लागू करण्याच्या मागणीसाठी महापालिका कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण सलग नवव्या दिवशीही सुरूच आहे. या आंदोलनाच्या समर्थनार्थ सफाई कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले असल्याने शहरातील दैनंदिन साफसफाईचे काम ठप्प झाले आहे. त्यामुळे शहर आणि उपनगरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून, रस्ते कचऱ्याने माखले आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अस्वच्छतेमुळे शहरात विविध आजारांचा फैलाव होऊन रोगराई पसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे कामगार युनियनच्या मागण्यांबाबत गांभीर्याने दखल घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. महापालिकेत मागील आठ दिवसांपासून युनियनचे पदाधिकारी उपोषणास बसले आहेत. नवव्या दिवशी मंगळवारी (दि. ३) त्यात आणखी दोन पदाधिकाऱ्यांची भर पडली आहे. दरम्यान या आंदोलनामुळे शहरातील नागरी सोयीसुविधांवर विपरित परिणाम होऊ लागले आहेत. दैनंदिन साफसफाई ठप्प झाल्याने सर्वत्र अस्वच्छता पसरली आहे. कचऱ्यामुळे रस्त्याचे विद्रुपीकरण झाल्याचे चित्र आहे. या आंदोलनाबाबत तातडीने तोडगा काढण्यासाठी सर्वच राजकीय पक्षाकडून शासन व प्रशासनावर दबाव वाढत आहे. तथापि अद्याप तरी तोडगा निघालेला नसून आंदोलनामुळे नागरिकांनाही कचऱ्यासह विविध नागरी समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## युनियन पदाधिकाऱ्यांच्या उपोषणाला मनपा महिला कर्मचाऱ्यांचा पाठिंबा

महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी उपोषण सुरू असून आज नवव्या दिवशी उपोषणकर्ते बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाबासाहेब राशिनकर यांना पाठिंबा देण्यासाठी नंदकुमार नेमाने व अजय सौदे या दोघांनी उपोषण सुरू केले आहे. आज महिला कर्मचारी सर्व कामकाज बंद ठेवून उपोषणास पाठिंबा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत, राज्य सरकारची कॅबिनेट बैठक असून त्या निमित्त मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विविध खात्याचे मंत्री मुंबई येथील मंत्रालयात उपस्थित असल्यामुळे सर्वांच्या नजरा सातवा वेतन आयोगाला मंजुरी मिळण्याकडे आहेत. उपोषणकर्त्यांची तब्येत खालावत चालली असून सरकारने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी महिलांनी केली.

## नगरसह राज्यातील एसटी कर्मचारी संपावर

राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनाप्रमाणे वेतन मिळावे या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी मंगळवार (दि.३) पासून बेमुदत संप पुकारला आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या तोंडावर राज्यभरातील बस सेवा विस्कळीत झाली आहे. नगर जिल्ह्यात असलेल्या सर्व ११ डेपोतील कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. त्यामुळे एस टी बसेस डेपोच्या आवारात उभ्या आहेत. या मुळे प्रवाशांचे मात्र मोठे हाल झाले.

खाजगीकरण बंद करा, सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या

*(पुढील मजकूर पान २ वर)*

खुशखबर ... खुशखबर ...... खुशखबर .........
जीवन ज्योत मेडिकल फाउंडेशन्स
बॉम्बे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी
शासकीय नोकरीची पात्रता व हमी असलेले कोर्स
विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रा मध्ये करिअर घडवण्याची उत्तम संधी
प्रवेश देणे चालू आहे
(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त)
कॉलेज फी १०५०० रु प्रती वर्ष
पात्रता : १० वी / १२ वी / पास-नापास
कोर्स कालावधी : २ वर्ष
MEDICAL LAB TECHNICIAN (DMLT)
नगर, महानगरपालिका, जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकिय ग्रामिण / जिल्हा रूग्णालय, निमशासकिय, खाजगी, मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, पॅथॉलॉजीकल लॅब, मेडीकल कॉलेजेस व फार्मसी कॉलेजेस मध्ये लॅब टेक्निशियन म्हणुन नोकरी मिळण्याची सुवर्णसंधी.
वयाची अट नाही ... त्वरा करा .... मर्यादित जागा .....
महाराष्ट्रातील अनेक शासकिय व निमशासकिय रूग्णालयामध्ये या अभ्यासक्रम उत्तीर्ण विदयार्थ्यांना लॅब टेक्निशियन पदासाठी (स्के. ९३००-३४८०० ग्रेड पे ५६००) भरती प्रकीया झाली आहे. शासकिय अप्रंटीशिपची सुविधा.
महाराष्ट्र शासनाचे Paramedical Council मध्ये रजिस्टेशन करता येते.
शासकीय शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्जासाठी मार्गदर्शन
अधिक माहिती व प्रवेशासाठी आजच संपर्क करा
8830685732, 9373560452
बॉम्बे हॉस्पिटल बिल्डिंग / बेकर्स समोर, वन विभाग कार्यालय मागे, नगर- औरंगाबाद रोड, अहमदनगर - ४१४००१

१० वे पुण्यस्मरण...
होंठों पर नाम आते ही यादें, ताज़ा हो जाती हैं, याद ताज़ा होते ही आँखें, छलक जाती हैं, गुजरे दिनों की तस्वीर, साफ नजर आती हैं, सब होते हुए भी आपकी, कमी खल जाती हैं..
स्व. चंद्रकुमार हरीराम माखीजा
स्व. दि. ३/९/२०१४
आपकी पावन स्मृती में भावपूर्ण श्रध्दांजली
दुःखांकित
राजा । महेंद्र । अनिल (भाई)
किशन । दिपक (लड़के) । हिमांशु (भतीजा)
एवम् समस्त माखीजा परिवार
फर्म - श्री गणेश टेलिकॉम
नेता सुभाष चौक, अ. नगर

कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant... कंपनीचे अधिकृत विक्रेते
• न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
• ३१ वर्षापासून सेवेत
• इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
• लहान मुलांच्या तपासण्या • स्पीच थेरपी
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
15% Discount
साई सर्जिकल अँड हिअरिंग सर्व्हिसेस
मुख्य शाखा : कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहमदनगर.
मो. 83800 41240
शाखा नं. १ : शॉप नं. १५, डी.पी. रोड, शिवतारा गार्डन, गणेश सोसायटी, चैतन्यनगर, कोथरुड, पुणे. मो. 9028075405
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)

व्हाट्सअ‍ॅप वर चॅट करण्यासाठी QR कोड स्कॅन करा
ATHER
या गणेशोत्सवात सेफ्टी व स्मार्ट फीचर्सवाली Ather घरी आणूयात
₹10,000 ची बचत करा.
EMPS सबसिडी 30 सप्टेंबर ला संपत आहे.
EMI - ₹२९९९/-* पासून सुरु
कमी व्याज - ५.९९%* पासून सुरु
RIZTA ₹1,09,999* पासून सुरु
450 Series ₹1,15,999* पासून सुरु
*T & C Apply
एथर स्पेस एक्सपीरियंस सेंटर, अहमदनगर
सिना नदी ब्रिज जवळ, नगर पुणे रोड, कायनेटिक चौक, अ. नगर
Start a Conversation today
75 0787 7777

सेल... सेल... सेल... सेल... सेल... सेल...
स्पेशल मिळवा सेल
रेजल
महासेल महामेळावा
इस से सस्ता कही नहीं...
शालु । फॅन्सी डिझायनर साडी
कॉटन सिल्क साडी । कॅटलॉग साडी
प्युअर येवला पैठणी
महिलांसाठी रोजगार योजना
घर बसल्या साड्यांचा व्यवसाय करुन कमवा ५ ते ५० हजार महिना तेही मिल रेटमध्ये
मिल टु ग्राहक
SNB MILL
फॅन्सी साडी । कुर्ती । टॉप । लेगिंग्ज
8182818220
नगर अर्बन बँक रोड, बोरा ज्वेलर शेजारी, कापड बाजार, अहमदनगर - ४१४ ००१

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Get a Plant Today!
• Potted Planters
• Premium Planters
• Garden Accessories
• Garden Furniture
• Garden Lightings
Fresh Environment with Indoor Plants
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

हे तुमच्या संगे घडू देवू नका
सावधान...
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
98222 94622
94220 87757
Don't let this happen to you

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## शुभ मुहूर्त... सावधान...

शुभ मुहूर्त म्हणजे शुभवेळ. ज्याचे भारतीय संस्कृतीत परंपरेत खूप मोठं महत्त्व आहे. प्रत्येक शुभप्रसंगी त्याला मानाचे स्थान मिळते.

मुहूर्ताची कल्पना, संकल्पना प्राचीन हिंदू संस्कृतीच्या काळापासून चालत आलेली आहे. मुहूर्ताचा वापर करूनच वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, व्यावसायिक शुभारंभ, लग्नादि कार्ये करण्याचा प्रघात आहे. तसं तर चांगले काम करणाऱ्याला मुहूर्ताची गरजच काय? ही अंधश्रद्धा मानणारे अनेक आहेत, पण भविष्यकालीन शुभ फलितांसाठी मुहूर्त पाहायला काय हरकत असावी? पण येथेही मुद्दा येतो तो मुहूर्तावर शुभारंभ होतात का? त्या शुभमुहूर्तावर सोडून २–३ तासानंतर तो मुहूर्त साजरा करण्यात येतो.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

मुहूर्त म्हणजे ठराविक व विशिष्ट वेळात कार्यारंभ करण्याची वेळ. ती प्रत्येकाची चंद्र रास, लग्न रास व नक्षत्रानुसार गणित करता येते. पृथ्वी स्वतःभोवती प्रदक्षिणा घालणारा काळ म्हणजे एक वर्ष.



मुहूर्त हा शब्द वेदकालीन असून, तो ऋग्वेदामध्ये विशेषतः वापरला गेलाय. मुहूर्त शुभा, मुहूर्त जया, मुहूर्त सिद्धी असे प्रमुख मुहूर्त असतात.

मंडळी आता आपण मुहूर्ताची वेळ काढण्यापेक्षा शुभ संकल्प व शुभकार्याला शुभारंभ करू या.

# खांद्याला खांदा लावून संघर्ष लढ्यामध्ये लढत राहू असं वचन आम्ही तुम्हाला देतोयं

### तुमच्या डोळ्यातील प्रत्येक अश्रूची किंमत आम्ही वाया जाऊ देणार नाही : राजु गुंड



उपोषणास बसलेले मनपा कर्मचारी. (छाया – लहू दळवी)

नगर – बेमुदत उपोषणा दरम्यान बाबासाहेब मुदगल मोर्चाला संबोधित करत असताना त्यांचे अश्रू अनावर झाले होते. बाबासाहेब तुम्हाला आत्मक्लेष करून घेण्याची गरज नाही. कारण तुम्ही हा जो लढा उभा केला आहे तो तुमच्या एकट्यासाठी नसून सर्व कर्मचारी बांधवांसाठी आहे. आम्हा कर्मचाऱ्यांसाठी तुम्ही जो अन्नत्याग करून लढा उभारला आहे याची आम्हा कर्मचारी बांधवांना पूर्णपणे जाणीव आहे. तुमच्या प्रत्येक डोळ्यातील अश्रूची किंमत आम्ही वाया जाऊ देणार नाही. तुमच्या खांद्याला खांदा लावून या संघर्ष लढ्यामध्ये आम्ही लढत राहू असं वचन आम्ही कर्मचारी बांधव तुम्हाला देतो, असे राजु गुंड यांनी म्हटले आहे.

केंद्र शासनाने सन २०१६ साली सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केली व प्रत्येक राज्य सरकारला अंमलबजावणी करण्यास सांगितले, यामध्ये अनेक नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद आदी संस्था येतात, महाराष्ट्र मध्ये जवळजवळ तीन महानगरपालिका वगळता सर्वच महानगरपालिकेला सातवा वेतन आयोग व त्यांच्या फरकाची रक्कम अदा करण्यात आली परंतु आज आठ वर्ष झाले तरीही अहमदनगर महानगरपालिकेला सातवा वेतन आयोग मंजूर करण्यात आलेला नाही अहमदनगर महानगरपालिका प्रशासकीय पातळीवर प्रस्ताव तयार होऊन तो मंत्रालयात दाखल आहे परंतु त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही अहमदनगर महानगरपालिकेच्या कर्मचारी युनियनने दहा महिन्यापूर्वी सातवा वेतन आयोग मिळावा म्हणून अहमदनगर ते मुंबई असा पायी मोर्चा काढण्यात आला, या मोर्चामध्ये संपूर्ण महानगरपालिका कर्मचारी सामील झाले. सदर मोर्चा हा नगर ते भाळवणी इथपर्यंत गेला होता, भाळवणी येथे मुक्कामी असताना आम्हाला आश्वासनाचे राज्य सरकारचे पत्र प्राप्त झाले होते आणि लवकरच आपणास सातवा वेतन आयोग मिळेल असा आश्वासन आम्हाला मिळाले होते सदरचा मोर्चा स्थगित करावा अशी विनंती देखील करण्यात आली त्यामुळे आम्ही नगरकरांचा विचार करून सदरचा मोर्चा हा स्थगित केला आज याला दहा महिने उलटून गेले तरी पण सातव्या वेतन आयोगाची मंजुरी आम्हाला मिळाली नाही.

युनियनचे पदाधिकारी सतत या गोष्टीचा पाठपुरावा करत होते परंतु त्याला यश प्राप्त होत नव्हते. कारण आम्ही किती दिवस प्रयत्न करणार आम्हा कर्मचाऱ्यांचा सहनशीलतेचा अंत झाला, आम्हा कर्मचारी युनियनचे प्रतिनिधी कामगार अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर व बाबासाहेब राशिनकर यांनी आमरण उपोषणाचा निर्णय घेतला, आज त्याला ९ दिवस पूर्ण झाले आहे. आम्हाला बेमुदत संप करून शहरवासीयांना वेठीस धरण्याची इच्छा नाही परंतु आम्ही कर्मचारी रात्रंदिवस ऊन, पाऊस, वारा याची तमा न बाळगता शहराला सुविधा पुरवण्याचे काम करतो कोविड काळामध्ये देखील जोखीम पत्करून शहरवासीयांची सेवा केली नगरकरांनी सुद्धा आमची बाजू समजावून घ्यावी महानगरपालिका प्रशासन व राज्य शासनाने दखल घेतली पाहिजे हीच आमची मागणी आहे.

आम्ही सातव्या वेतन आयोगासाठी आमरण उपोषणाची हाक देऊन आमच्या मागणीसाठी टाहो फोडत आहेत. यासाठी आम्हा सर्व कर्मचाऱ्यांचे शहरवासीयांना व नगर शहरातील सर्व राजकीय व सामाजिक संस्थांना विनंती आहे की आम्हाला लवकरात लवकर सातवा वेतन आयोग मिळावा यासाठी राज्य शासनाची मंजुरी मिळून देण्यासाठी प्रयत्न करावे यासाठी कुठलेही राजकारण न करता एक कर्मचारी बांधवांविषयी असलेली आपलेपणाची भावना जपावी हीच आमची विनंती आहे. वास्तविक पाहता आमचे जे उपोषणकर्ते बाबासाहेब मुदगल बाबासाहेब राशिनकर व जितेंद्र सारसर हे आमरण उपोषणाला बसलेले आहेत त्यांच्यासोबत कामगार युनियनचे माजी अध्यक्ष अनंत लोखंडे व सचिव आनंद वायकर हे सुद्धा खांद्याला खांदा लावून या लढ्याला साथ देत आहे व सर्व कर्मचारी एकजुटीने त्यांच्या पाठीशी उभे आहेत.

# ७ वा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावा अन्यथा आंदोलनामध्ये नागरिकही सहभागी होतील

### मनोज कोतकर यांचा इशारा; कर्मचाऱ्यांच्या उपोषणाला पाठिंबा



सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनपा कर्मचारी गेल्या आठ दिवसापासून उपोषणास बसले असून त्याला मनोज कोतकर यांनी पाठिंबा दिला. (छाया – लहू दळवी)

नगर – अहमदनगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून तो मार्गी लागावा यासाठी महापालिकेचे कर्मचारी गेल्या आठ दिवसापासून उपोषणाला बसले आहे मात्र त्यांचा प्रश्न अद्याप पर्यंत मार्गी लागला नाही, मनपा कर्मचारी रात्रंदिवस नगरकरांना मूलभूत सुविधांपासून काम करत असतात संकट काळामध्ये सगळ्यात आधी धावून जर कोणी येत असेल तर तो मनपा कर्मचारी असतो त्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी लढा उभारला असून राज्य सरकारने तातडीने सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा या आंदोलनामध्ये नागरिकही सहभागी होतील असा इशारा मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी दिला.

मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनपा कर्मचारी गेल्या आठ दिवसापासून उपोषणास बसले असून त्याला मनोज कोतकर यांनी पाठिंबा दिला. यावेळी मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# मनपा कर्मचाऱ्यांच्या उपोषणास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पाठिंबा

### पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे लक्ष घालणार आणि मुख्यमंत्र्यांशी बोलणार : गजेंद्र राशिनकर



मनपा कर्मचाऱ्यांच्या उपोषणास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने पाठिंबा देण्यात आला.

नगर – सातवा आयोग लागू होण्यासाठी मनपा कर्मचाऱ्यांनी गेल्या ९ दिवसांपासून सुरू केलेल्या उपोषणाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठींबा दिला असून हा प्रश्न लवकर मार्गी लागावा यासाठी पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे हे लक्ष घालणार आणि मुख्यमंत्र्यांशी बोलणार असल्याची माहिती शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांनी दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, विनोद काकडे, दीपक दांगट, महेश चव्हाण, तुषार हिरवे, संकेत चव्हाण आदी उपस्थित होते.

निवेदनात पुढे म्हंटले की, अनेक वर्षांपासून मनपा कर्मचाऱ्यांची सातवा वेतन लागू करण्याची मागणी प्रलंबित आहे. या मागणीबाबत शासन दरबारी विविध पद्धतीने पाठपुरावा केलेला आहे. परंतु अद्याप त्यास यश आलेले नाही. वास्तविक राज्यातील इतर सर्व महानगरपालिकांना सातवा वेतन आयोग लागु झालेला असताना केवळ अहमदनगर महानगरपालिकेला सातवा वेतन आयोग लागू न होणे, ही कर्मचाऱ्यांवर अन्यायकारक बाब आहे. राज्यासह देशात महागाई गगनाला भिडलेली आहे. या महागाईत कर्मचारी स्वतः चं कुटुंब सांभाळू शकला नाही तर कामकाज कस सांभाळणार? आणि याचा नागरी सेवेवर निश्चितच परिणाम होत असतो. जनसेवेच्या या निस्वार्थी भावनेतून आम्ही आपल्या आंदोलनास पाठिंबा देत आहोत. आम्ही आमच्या पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याकडे हा प्रश्न मांडू व याबाबत मुख्यमंत्री यांच्यासह राज्य सरकारला सदर सातवा वेतन आयोग लागू करण्यास भाग पाडण्यास सांगु, तसेच वेळ पडल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपल्या या प्रश्नासाठी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडेल अशी हमी देतो, असे म्हटले आहे.

# जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाचा हिरवा कंदिल

नगर – जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने हिरवा कंदिल दिला असून, हे नाव देण्यास विभागाची कोणतीही हरकत नसल्याचे पत्र दिल्याने जिल्ह्याच्या नामांतराचा मार्ग सुकर झाला असल्याचे महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्याची मागणी झाल्यानंतर राज्यातील महायुती सरकारने अहिल्यानगर असे नाव देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. नामांतराच्या बाबतीतील सर्व प्रक्रीया ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत पुर्ण होत असल्याने प्रत्येक विभागाची ना हरकत आवश्यक असते.

केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नामांतराच्या बाबतीत हरकत नसल्याचे पत्र जारी करुन, अहिल्यानगर नावास मान्यता दिली आहे. या नावाचे कोणतेही रेल्वेस्थानक देशात नसल्याचेही त्यांनी आपल्या पत्रात नमुद केल्याने जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यातील पहिला टप्पा पुर्ण होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# सेवानिवृत्त व्रणोपचारक करणार जिल्हा परिषदेसमोर उपोषण

नगर – सातव्या वेतन आयोगामध्ये, तीसऱ्या लाभाच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ न मिळाल्याने सेवानिवृत्त व्रणोपचारक ४ सप्टेंबर पासून जि.प. अहमदनगर समोर उपोषण करणार आहेत.

महाराष्ट्र शासनाने ७ वा वेतन आयोगा अंतर्गत १०/२०/३० या क्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ मंजूर केला आहे. त्यानुसार सेवा निवृत्त व्रणोपचारक ३० वर्षांच्या सेवेनंतर देय असलेल्या ३ रा लाभास १/१/२०१६ पासुन पात्र असुन अद्याप पर्यंत सदरचा ३ रा लाभ मंजूर झालेला नाही. आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ मिळणेसाठी वेळोवेळी भेट देवून अधिकारी यांच्याशी चर्चा करुन विनंती करूनही तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना वेळोवेळी पत्र व्यवहार केलेला असूनही अद्याप पर्यंत तीसरा लाभ मिळालेला नसल्याचे सेवा निवृत्त व्रणोपचारक यांनी निवेदनात नमूद केले आहे.

तसेच पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर या विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेले पशुधन पर्यवेक्षक, सहा पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगामध्ये, तीसऱ्या लाभाच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ दिला आहे. परंतु फक्त गट ड वर्ग चार व्रणोपचारक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना तीसरा लाभ दिलेला नाही. सदरचा तीसरा लाभ मिळणेसाठी पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद अहमदनगर येथे चौकशी केली असता कार्यालयाकडून दिशाभुल केली जात आहे. ही बाब सेवा निवृत्त व्रणोपचारक अन्यायकारक असुन मनस्थितीवर विपरीत परिणाम करणारी आहे. फक्त गट ड वर्ग चार व्रणोपचारक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना तीसरा लाभ दिलेला नाही. त्यामुळे सेवानिवृत्त व्रणोपचारक जि.प. समोर उपोषण करणार आहेत.

# एसटी कर्मचारी बेमुदत संपावर

(पान १ वरुन)

कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन (पेंशन) मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करा. तसेच महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रीय कार्यालयात संयुक्त घोषणा पत्रानुसार दुरूस्ती करण्यात यावी. चालक/ वाहक/ कार्यशाळा व महीला कर्मचा–यांना अद्यावत व सर्व सुखसोईचे विश्रांतीगृह द्या. इनडोअर व आऊटडोअर मेडीकल कॅशलेस योजना लागू करा. सुधारीत जाचक शिस्त व आवेदन कार्यपद्धती रद्द करा. वेळापत्रकातील त्रुटी दूर करा. जुन्या झालेल्या बस चालनातून काढून टाका व स्वमालकीच्या नवीन बस खरेदी करा. विद्यमान व सेवानिवृत्त कर्मचा–यांच्या कुटूंबियांना सर्व प्रकारच्या बसेसमध्ये फरक न भरता वर्षभराचा मोफत पास द्या. या मागण्यांसाठी हे आंदोलन केले जात आहे. या सर्व मागण्या आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी मंजूर कराव्यात, असे आवाहन एसटी कर्मचारी कृती समितीकडून करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी शब्द देऊनही मागण्या मान्य न केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. सरकारसोबत चर्चेसाठी केव्हाही तयार आहे. मात्र प्रत्येकवेळी कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली जातात. आम्ही या आंदोलनावर ठाम आहोत. मागण्या मान्य झाल्या नाहीत तर अजून तीव्र आंदोलन करू असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. ऐन सणासुदीच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. राज्यभरातील एकाही जिल्ह्यातील एसटी बस डेपोमधून एकही बस सोडण्यात आलेली नाही. हा संप केव्हापर्यंत सुरू राहील याबाबतही साशंकता आहे. या संपामुळे एसटीला मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. नगर मधील बसस्थानकावर अनेक प्रवासी बस येईल या आशेवर बस ची वाट पाहत बसलेले दिसले. एस टी बस ने प्रवास करणारे हे बहुतांश ज्येष्ठ नागरिक, महिला व शालेय विद्यार्थी आहेत. त्यांचे ही बस सेवा विस्कळीत झाल्याने मोठे हाल झाले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्म स्थळी जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी नाक रगडून माफी मागावी व राजीनामे द्यावे



डॉ. परवेझ अशरफी

नगर – खरंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर आणि सन्मान असेल तर आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्म स्थळी जाऊन नाक रगडून माफी मागावी आणि कोणताही विलंब न करता आपल्या पदाचे राजीनामे द्यावे अशी मागणी डॉ. परवेज अशरफी यांनी मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे. महाराजांचा पुतळा उभारण्यात जे सरकार भ्रष्टाचार करत असेल तर ते जनतेला न्याय कुठून देणार? असा सवालही अशरफी यांनी केला आहे.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा महायुती सत्तेत आल्यानंतर प्रधान मंत्री यांचे हस्ते डिसेंबर २०२३ राजकोट, मालवण येथे उभारला आणि त्याचे श्रेय लाटले. परंतु सरकारच्या भ्रष्ट कारभारामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा एक वर्ष ही टिकला नाही. महाराष्ट्रातील रयतेचे राजे ज्यांनी १८ पगड जाती आणि १२ बलुतेदार यांना एकत्र घेऊन रयतेचे राज्य स्थापन केले. त्यांचा पूर्णाकृती पुतळा आठ महिन्यातच पाडला. यावरून स्पष्ट दिसते की महायुती सरकार आणि त्यांनी दिलेला ठेकेदार या सर्वांनी भ्रष्टाचार करण्यात महाराजांनाही सोडलं नाही. पुतळा उभारण्यात ज्या ज्या बाबींची दक्षता घेणे आवश्यक होते त्या बाबींचा सरकारने विचार केलेला दिसत नाही. अवघ्या दोन महिन्यात सरकारने महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी मंजुरी देऊन इतका मोठा पुतळा उभारण्याचा ज्याला काहीही अनुभव नाही अश्या व्यक्तीची शिफारस करून काम दिले. असा आरोप एम आय एम जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी यांनी केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून त्यात असे नमूद केले की, मागील १० वर्षात मोदी सरकारने बांधलेले पूलांपैकी बहुतांश कोसळले, प्रभू रामाचे मंदिर गळायला लागले, नवीन संसद गळायला लागले, प्रभू राम मंदिर जवळील नवीन झालेल्या रस्त्यात मोठ मोठे खड्डे झाले, ज्यावेळेस पुतळा उभारण्यात आला होता. तेव्हा काही शिवप्रेमींनी शंका व्यक्त केली होती की महाराजांचा पुतळा याचा दर्जा टिकण्या सारखा नसून चेहऱ्यावरचे हावभाव महाराजांचे नाही परंतु त्या विषयाकडे महायुती सरकारने दुर्लक्ष केले. महाराजांच्या नावाने राजकारण करतात त्याच महाराजांच्या पुतळ्यात महायुती सरकारने भ्रष्टाचार केल्याचे दिसत आहे. पुतळा कोसळल्यावर मुख्यमंत्री यांनी पत्रकारांना सांगितले की वारे जोराने वाहत होते त्यामुळे पुतळा कोसळला. यावरून असे दिसते की मुख्यमंत्री यांना घटनेचे कोणतेही गांभीर्य नव्हते किंवा त्यांनी हा प्रकार गांभीर्याने घेतलेला नाही.

प्रधानमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी जनतेची माफी मागितली. परंतु सदर माफी ही फक्त ढोंग किंवा राजकीय नुकसान वाचवण्याचे हेतूने मागितली आहे. म्हणजेच मागितलेली माफी ही फक्त जनतेची दिशाभूल करणारी असल्याचा टोला डॉ. परवेज अशरफी यांनी लावला.

# ठेवीदारांनी अवाजवी व्याजाचे आमिष दाखवणाऱ्या पतसंस्थांपासून दूर रहावे

### राज्य मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांचे आवाहन



राज्य मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना फेडरेशन अध्यक्ष सुरेश वाबळे. यावेळी संचालक कडूभाऊ काळे व शिवाजी कपाळे उपस्थित होते.

नगर – मल्टीस्टेट पतसंस्थांच्या ठेवीदारांना जादा व्याजाचे आमिष दाखवणाऱ्या तसेच चुकीचे कर्ज वाटप करणाऱ्या राज्यातील ९ मल्टीस्टेट पतसंस्थांविरोधात केंद्रीय सहकार निबंधकांकडे तक्रार केल्या आहेत. त्यावर लवकरच सुनावणी अपेक्षित आहे. जिल्ह्यातील ४५ मल्टीस्टेट पतसंस्था या मल्टीस्टेट फेडरेशनच्या सभासद आहेत. या सर्व पतसंस्थांना फेडरेशन मार्फत वेळोवेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जात असल्याने या पतसंस्थेचे काम व्यवस्थित चालू आहे. तसेच फेडरेशनच्या सभासद असलेल्या पतसंस्था ठेवीदारांना १० टक्क्यांपेक्षा अधिक व्याज देणार नाही तसेच ठेविदारांचे हित जपणे, चुकीचे कर्जवाटप न करणे आदी बाबतचे नियम लागू करण्यात आले आहेत. फेडरेशनच्या सभासद असलेल्या पतसंस्था जर अडचणीत आल्या तर फेडरेशन अशा पतसंस्थांना पाठबळ देत त्यांना अडचणीतून बाहेर काढत आहे. अवाजवी व्याजाचे आमिष दाखवणारी भाग्यलक्ष्मी पतसंस्था ही फेडरेशनची सभासद नाही. त्यामुळे ठेवीदारांनी अशा अवाजवी व्याजाचे आमिष दाखवणाऱ्या पतसंस्थांपासून दूर रहावे, असे आवाहन राज्य मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केले.

जिल्ह्यातील काही पतसंस्थांमधून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नसल्याच्या तक्रारी येत असल्याने जिल्ह्यातील काही मल्टीस्टेट पतसंस्था ठेवीदारांची फसवणूक करत असल्याचे उघड होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी पत्रकार परिषदेत फेडरेशनची भूमिका स्पष्ट करून ठेविदाराना आवाहन केले आहे. यावेळी फेडरेशनचे संचालक कडूभाऊ काळे व शिवाजी कपाळे उपस्थित होते.

यावेळी भाग्यलक्ष्मी मल्टीस्टेट पतसंस्थेचा व नागेबाबा मल्टीस्टेटचा काहीही संबंध नाही. भाग्यलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन याबाबत खोटा प्रचार करत आहे. त्यामुळे ठेवीदारांनी त्यांच्यावर विश्वास ठेवू नये, असा खुलासा संत नागेबाबा मल्टीस्टेट पतसंस्थेचे चेअरमन कडूभाऊ काळे यांनी यावेळी केला.

# रमेश मुदकवि यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील दिल्लीगेट परिसरातील साताळकर हॉस्पिटलजवळील रहिवासी रमेश विष्णुपंत मुदकवि (वय ८३) यांचे वृध्दापकाळाने ३१ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

रमेश मुदकवि हे कंस्ट्रक्शन व्यवसायात होते. अहमदनगर एम आयडीसीमधील व्यावसायिक अमेय मुदकवि यांचे ते वडील होत.

# गृहिणी

## आरोग्य

### पायांचे सौंदर्य जपा

आपल्या शरीराचा संपूर्ण भार आपले पाय पेलतात. त्यामुळे पायांची जास्त काळजी घेणे गरजेचे आहे. बरेच लोक स्वत:ची फार काळजी घेतात मात्र पायांची मात्र उपेक्षा करतात. त्यामुळे चारचौघात पाय झाकावे लागतात. असे होऊ नये म्हणून पायांची निगा राखली पाहिजे. सुंदर, निरोगी पाय आपले सौंदर्य परिपूर्ण करतात. चुकीच्या पद्धतीच्या चपला, बूट घातल्याने पायांचे सौंदर्य बिघडते आणि आरोग्यही धोक्यात येते.

## पाककला

### संदेश

**साहित्य :** एक किलो पनीर, दोन वाट्या साखर, केशर अगर केशरी रंग, बेदाणे, पिस्ते, बदाम, वेलदोडे.

**कृती :** कढईत पनीर व साखर मिसळून कोरडे होईपर्यंत परतावे. नंतर वेलदोड्यांची पूड व केशर अगर केशरी रंग घालून पनीर कोरडे होताच कढई खाली उतरवावी व पनीर गरम असतानाच त्याचे गोळे करून पाहिजे तो आकार द्यावा. वरून बेदाणे, बदाम आणि पिस्ते यांचे काप घालावेत.

## वास्तू

### व्यावसायिक पोस्टर्स

* व्यावसयिक जागामध्ये जे प्रॉडक्ट्स अथवा सर्व्हिसेस आपण विकू इच्छितो त्यांची पोस्टर्स वायव्य भागात लावावी.
* एकाच प्लॉटमध्ये एकाच घराण्यातील दोन कुटुंबे राहत असतील तर दोघांची प्रवेशद्वारे वेगळी असावी व ती प्रत्येकी त्यांच्या वैयक्तीक घराच्या पूर्व दिशेत असावी.

## सल्ला

तवा शेगडीवरुन उतरवल्यावर त्याला ताक अगर लिंबू अगर चिंच लावून ठेवावी, म्हणजे तवा स्वच्छ निघतो.

## सौंदर्य

एखाद्या औषधाची ॲलर्जी किंवा रिॲक्शन आल्याने केस पांढरे होतात. अनुवंशिकतेमुळेही केस पांढरे होऊ शकतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ४ सप्टेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, उत्तरा ३०।१४, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. पोरकटपणा करणे टाळा.

**कर्क** : आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक राहिल. वाहन चोरी होण्याची शक्यता.

**सिंह** : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न कराल.

**कन्या** : आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्याल त्यामुळे यशस्वी व्हाल.

**तूळ** : योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**वृश्चिक** : आपल्याला कार्यालयामध्ये अथवा घरामध्ये आज थोडा मनस्ताप होईल. वाहने सांभाळा.

**धनु** : मागील उधारी उसनवारी वसुल होईल. हॉटेलिंगसाठी खर्च होईल.

**मकर** : मागील काही दिवसांपासूनचे नियोजन आज फळास येईल.

**कुंभ** : बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाची कामे फत्ते होतील. हितशतू त्रास देतील.

**मीन** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. इच्छित योजना अंमलात येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# हसा आणि शतायुषी व्हा!

## जाहिरात

**रामराव :-** माझ्या पगाराचा मोठा हिस्सा जाहिरातीवर खर्च होतो.

**शामराव :-** पण मी तर आपली वर्तमानपत्रात कोणत्याच संदर्भात कसलीच जाहिरात पाहिली नाही.

**रामराव :-** ते बरोबर आहे. पण माझी बायको रोज वर्तमानपत्रातल्या जाहिराती वाचत असते.


# ...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* आशिया खंडाला युरोप खंडाकडून वेगळे करणारी पर्वतरांग - उरल
* भारतीय कायदेमंडळात समावेश नसलेली उच्चपदस्थ व्यक्ती - पंतप्रधान
* लो. टिळकांचे १ ऑगस्ट १९२० मध्ये निधन झाले ते शहर - मुंबई
* द्राक्षामध्ये असलेले आम्ल - टार्टारिक आम्ल

**संदर्भ - 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक**
**मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७००३

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७००२ चे उत्तर




**आडवे शब्द :-** १) हॉस्पिटल; रुग्णालय ४) दिवस; दिन; दीस ७) दम; भार; वजन; निकड; तगादा ८) प्रेत जाळण्यासाठी रचलेली लाकडे वगैरे; चिता ९) सर्पांचा राजा १०) मुसलमानी धर्मसूत्र ११) एकरूप; तादात्म्य १४) दाटी; गर्दी १५) जखमेतून वाहणारा द्रव; सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध १७) सभेचा प्रमुख; सभेचा अध्यक्ष १८) भारताचा रहिवासी २०) तेल निघणारे एक धान्य; चामखीळ २१) मदत करणारा; सहायक

**उभे शब्द :-** १) सावध; सजग; हुशार २) जनगणना; शिरगणती ३) नाटक करणारा; ढोंगी ४) गंध; राहणे ५) टोळीचा प्रमुख ६) लढाई; लढाईचे मैदान; वाळवंट ९) एक धान्य १०) प्राणायामचा एक प्रकार १२) कौरव-पांडवांची कथा १३) कमिटी; आयोग; कमिशन; मंडळ १६) नीट; वाकडा नसलेला १९) मृत्यूचा देव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : निघून गेलेला क्षण पुन्हा कधीच परत येत नाही.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## सिलिकॉन या मूलद्रव्याचे उपयोग काय?

सिलिकॉन हे मूलद्रव्य निसर्गात शुद्ध स्वरूपात सापडत नाही, पण निसर्गात सापडणाऱ्या अनेक खनिजांत सिलिकॉन-डाय-ऑक्साइड या स्वरूपात ते असते. पृथ्वीच्या कवचात फार मोठ्या प्रमाणात हे सिलिकॉन-डाय-ऑक्साइड सापडते. हे सिलिकॉन-डाय-ऑक्साइड विद्युत ऊर्जेच्या सहाय्यानं तापवून, त्यापासून शुद्ध सिलिकॉन मिळवता येते. हे क्वार्टझ, अगेट, जास्पर, कार्नेलियन अशा स्वरूपात सापडत असते. क्वार्टझ हे स्फटिक रूपात सापडणारे सिलिकॉन- डाय-ऑक्साइड.

सिलिकॉनचे शुद्ध स्वरूपात इलेक्ट्रॉनिक उद्योगात महत्त्वाचे उपयोग आहेत. पोलादात मिश्रण केलेले सिलिकॉन पोलादाची भारक्षमता वाढवते, तर सिलिकॉन व कार्बन यांचे मिश्रण हे पॉलिशिंग धंद्यात वापरले जाते. प्रकाशकीय घट आणि ट्रान्झिस्टर्स यांच्यामध्येही सिलिकॉन वापरले जाते. याशिवाय सिलिकासँडचा- यात क्वार्टझच्या वाळूचा समावेश आहे. याचा उपयोग निरनिराळ्या प्रकारच्या काचा तयार करताना होतो. अनेक मानवी उपयोगाची खनिजे ही निरनिराळ्या मूलद्रव्यांची सिलिकेट्स असतात.

## संगत

एका गावात एक माणूस राहत होता. तो माणूस परमेश्वराचा परमभक्त होता. दररोज गावातल्या मंदिरात तो नित्यनेमाने जात असे. मंदिरात जाताना देवासाठी सुगंधी फुलांचा हार, अगरबत्ती आणि दिवा घेऊन जात असे. भक्तिभावाने देवाची प्रार्थना करून आपल्या उद्योगधंद्याला सुरुवात करत असे.

दररोज आपल्या कामावर जाणे व परत आल्यावर प्रभूनाम गाता-गाता आपल्या कुटुंबात रममाण व्हावे, असा त्याचा दिनक्रम होता. थोडक्यात, एक देवभोळा सज्जन माणूस म्हणून त्याला गावात सारे ओळखत होते. माणसाबद्दल साऱ्यांना आदर होता.

एकदा सायंकाळी तो माणूस आपला उद्योग-व्यवसाय आटोपून लवकर घरी परतत होता. रात्री मंदिरात होणाऱ्या कीर्तनाला त्याला जायचे होते. रस्त्याने तो जात असताना त्याला दोन माणसे भेटली. त्या दोघांना हा सज्जन माणूस ओळखत होता. नेहमी त्यांच्याशी नमस्कार, चमत्कार तो करीत असे. ते दोघेही अट्टल व्यसनी होते. मदिरापान करण्याची त्यांना सवय होती. तसेच त्यांनी गावात काही लोकांना फसवले देखील होते. परंतु या सज्जन माणसाला याची काही कल्पना नव्हती.

दोघेही या माणसाशी गोडगोड बोलू लागले. इकडच्या-तिकडच्या गप्पा मारू लागले. बोलता बोलता ते म्हणाले,

''चला आम्ही तुम्हाला आमच्याकडून मेजवानी देतो.'' त्या माणसाने सांगितले, ''मला कीर्तनाला जायचे आहे.'' परंतु त्यांनी काही ऐकले नाही. त्याला बळेच आपल्याबरोबर नेले व मद्य पाजले. सज्जन माणसाला तो प्रकारच माहीत नव्हता. परंतु तो प्रकार वेगळा होता. त्यामुळे तो अधिक त्याकडे आकर्षित झाला. त्या दोघांची संगत त्याने अधिकच धरली. दररोज संध्याकाळी मद्यपान करून तो घरी परतू लागला. बघता बघता त्याचे मंदिरात जाणेही कमी झाले. थोड्याच अवधीत त्या सज्जनाला लोक दुर्जन म्हणू ओळखू लागले. अनेकांनी त्याला समजावण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण यश आले नाही.

तात्पर्य : वाईट संगत ही लगेच लागते व माणूस लगेच बिघडतो.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



इसी प्रकार के प्रेम की इच्छा हम सब को करनी चाहिए। इस प्रेम का कोई अंत नही होता।

इसीलिए संत दर्शनसिंह जी ने एक शेर में लिखा था :

**इश्क की कोई नहीं है इतिहा**
**इश्क का आगाज़ ही आगाज़ है**

एक आँसू एक सितारा आध्यात्मिक प्रेम कभी समाप्त नहीं होता। इसकी कभी मौत नहीं होती। चाहे हमारा भौतिक शरीर नष्ट हो जाए, आत्मा अपने सृजनकता के साथ सदा-सदा के लिए एकमेक रहती है। सोते-जागते, बैठते-चलत प्रेम हर क्षण हमें परिपूर्ण करता रहता है।

आध्यात्मिक मार्ग पर चल रहे विवाहित जोड़ों को जीवन में प्रेम की भूमिका समझनी चाहिए। यदि वे प्रभु की ओर की यात्रा में उन्नति करना चाहते हैं, तो उन्हें एक दूसरे की सहायता करने की ज़रूरत है। दोनों जीवनसाथियों को रूहानी सफर में एक दूसरे की सहायता करनी चाहिए। संत दर्शनसिंह जी इस विषय पर संत 'एक्जूपरी' का वक्तव्य दोहराया करते थे, प्रेम एक दूसरे की आँखों में देखना नहीं है, यह इकट्ठे एक ही दिशा में देखने का नाम है। और फिर वे इसमें अपनी बात जोड़ देते थे, और वह दिशा है प्रभु! । यदि दोनों मिलकर आध्यात्मिक ध्येय की ओर दृष्टि रखेंगे, तो वे शारीरिक मिलन से कहीं अधिक प्रेम, एक दूसरे के लिए पाएँगे। वे पाएँगे कि दोनों ही प्रभु-प्रेम से परिपूर्ण हो गए हैं। वे दोनों नाम या शब्द के साथ जुड़ने के रूहानी आनन्द का लुत्फ़ उठाएँगे । जैसे-जैसे वे प्रगति करेंगे, दोनों की आत्माएँ 'ज्योति' व 'श्रुति की धारा के साथ-साथ बढ़ती जाएँगी, जब तक कि वे प्रेम के अनन्त समुद्र तक नहीं पहुँच जातीं। जब दोनों आत्माएँ प्रभु प्रेम से ओत-प्रोत होंगी, तो दोनों एक ही समुद्र में तैरेंगी। दोनों एक ही परम सुख, एक ही हर्षोन्माद, एक ही मिलन से ओत-प्रोत होंगी। दो आत्माएँ इससे बढ़कर किस सांझे अनुभव का आनन्द ले सकती हैं? तब दोनों जीवनसाथी एक दूसरे के और निकट आ जाएँगे क्योंकि दोनों एक जैसी वर्णनातीत प्रसन्नता, एक जैसे अकथनीय परमसुख का अनुभव करेंगे। वे दोनों एक दूसरे के साथ किसी ऐसी (अलौकिक) चीज़ में भी भागीदार होंगे जिसके बारे में संसार में किसी को पता नहीं चलेगा। वे एक दूसरे के साथ 'ऐसी घनिष्ठता रखेंगे, जो किसी भी शारीरिक मिलन से कहीं अधिक होगी।

प्रभु : महानतम प्रेमी -

शारीरिक आकर्षणों में फंसकर, अपनी तवज्ञोह को इस धरती बांधे रखने की बजाय, हमें सच्चा प्रेम पाने के लिए कोशिश कर चाहिए। हम समझते हैं कि हम एक सांसारिक प्रेमी से प्रसन्नता और सख पा लेंगे, परन्तु प्रभु ही सबसे महान प्रेमी है। वास्तव में वह हमारा प्रियतम है। संत दर्शनसिंह जी महाराज फर्माया करते थे कि जब हम अपने प्रियतम से एकमेक हो जाते हैं, तो उसके बाद हमें मालूम नहीं रहता कि कौन प्रियतम है और कौन प्रेमी है। युगों-युगों से सभी सूफ़ियों व संतों ने दिव्य मिलन के बारे में लिखा है। बहुत से लोगों ने इसे प्रेमिका व प्रेमी के मिलन के रूप में समझाया है। प्रभु का प्रेम किसी भी सांसारिक प्रियतम के प्रेम से कहीं अधिक होता है। प्रभु का प्रेम इतना सम्पूर्ण और विस्तृत होता है कि हम स्वयं को भी भूल जाते हैं, हम समय, स्थान व अपना नाम भी भूल जाते हैं।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

# शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

जब कोई विपरीत लिंग की तीव्र याद आने लगे तो मन से दूर करते जाओ जैसे वह पीछे हट रही हैं उसे दूर हटाते जाओ जब वह आपसे बहुत दूर हो जाये, मन ही मन, अन्त में उसे कहो आऊट और एक दम आँखों से हटा दो। वह थोड़ी देर बार फिर याद आने लगेगा उसे ऐसे ही दूर हटाते जाओ और अनंत पर जाकर कहो आऊट । इस प्रक्रिया को बार-बार दोहराने से उस आत्मा की याद नहीं आयेगी। आपको अपवित्र संकल्प तंग नहीं करेंगे। प्रेम-वासना पर नियंत्रण कई बार अपवित्र विचार अर्थात् वासना के विचार बहुत तूफान मचाते हैं। दिमाग फटने को आता है। गंदे विचरों से अशांति बढ़ जाती है और मनुष्य बहुत घटिया हरकत कर बैठता है जिससे समाज में नाक कटवा लेता है। ये समस्या कभी-न-कभी हर व्यक्ति के जीवन में आती है जब वह न चाहते हुए भी अपवित्र विचारों को रोक नहीं पाता। कई बार ज्ञानी-ध्यानी भी फेल हो जाते हैं। विद्यार्थी भटक जाते हैं। ऐसे विचारों को रोकने का कोई उपाय नजर नहीं आता। लोग कहने लगते हैं ब्रह्मा अपनी बेटी पर फिदा हो गया था। देवता भी इस विकार को नहीं जीत सके हम तो साधारण मनुष्य हैं हम कैसे जीत सकते हैं। वासना के विचारों को जीतना असम्भव माना जाता है। एक बात याद रखो काम विकार को हम केवल भगवान की याद से समूल नष्ट कर सकते हैं परंतु सारी दुनिया भगवान को याद नहीं करती। हम किसी पर जबरदस्ती नहीं कर सकते कि आप भगवान को याद करो परंतु इस विकार से सारी दुनिया पीड़ित है। अतः इस विकार से छूटना चाहते हैं। क्या करें? सदा याद रखो दुनिया में कोई काम असम्भव नहीं होता। ऐसे ही इस असम्भव माने जाने वाले विकार को भी हर व्यक्ति जीत सकता है। जब मन में यह विकार तीव्रता से उठे तुरंत सांस बंद कर लो और मन ही मन भगवान को याद करो। जब सांस लेने के लिये मन छटपटाने लगे तब सांस ले लो। सांस लेने के बाद फिर सांस रोक लो जितनी देर तक रोक सकते हैं और भगवान को याद करो या कहो मैं शांत हूँ शांत हूँ। ये प्रक्रिया दोहराते रहो। पाँच से दस मिनट के अन्दर कैसी भी भयानक वृत्ति हो वह शांत हो जायेगी। इस वृत्ति को और जल्दी खत्म करने के लिये उपरोक्त अभ्यास करते हुए १०-१५ कदम इधर-उधर टहलते रहो तो देखना कैसी भी भयानक वृत्ति हो ३ से ५ मिनट में खत्म हो जायेगी। कर्मइन्द्रियांशांत हो जायेगी। यह वैज्ञानिक विधि है। जैसे कोई हमारा गला दबा दे तो हम अपनी जान बचाने के लिये सब कुछ छोड़ने को तैयार हो जाते हैं। ऐसे ही यहाँ सांस का रोकना अर्थात् अपना गला दबा लिया इसलिये मन अपने को जीवित रखने के लिये अपने सब विचार छोड़ने को तैयार हो जाता है। इस तरह कोई भी, ज्ञानी चाहे अज्ञानी अपने अपवित्र विचारों को जीत सकता है। प्रेम और अपवित्र विचार साँस रोक कर भगवान को याद करने से अपवित्र विचार रुक जाते हैं। ऐसे ही कोई भी अन्य नकारातमक वृत्ति जैसे क्रोध, अहंकार, ईर्ष्या या आलस्य आदि मन में उठने लगे तुरंत साँस रोक कर भगवान को याद करो तो वह वृत्ति खत्म हो जायेगी। अपवित्र विचारों को खत्म करने की दूसरी विधि यह है कि जब भी आप किसी से मिलें, लिंग या पुल्लिंग हो उसके माथे पर देखो। उससे नेत्र सम्पर्क नहीं करना। अगर हम किसी दूसरे से २० सेकेंड से ज्यादा नेत्र सम्पर्क करते हैं तो आपका उस पर प्रभाव पड़ रहा होता है या उसका प्रभाव तुम्हारे पर पड़ रहा होता है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

## शीतपेये

शहरी भागामध्ये थम्सअप, लिम्का, कोकाकोला, माझा, सोडा, पेप्सी, मिरिंडा अशा प्रकारची शीतपेये पिण्याचे प्रमाण सध्याच्या काळात वाढलेले आहे. तत्काल ऊर्जा मिळविण्यासाठी व तहान भागविण्यासाठी या शीतपेयांचा नक्कीच उपयोग होतो; पण त्याचबरोबर वारंवार जर यांचा जास्त प्रमाणात वापर केला, तर त्यांचे शरीरावर दुष्परिणाम होतात. म्हणून क्वचितच यांचा वापर करावा.

**औषधी गुणधर्म** : यामध्ये शरीराचे पोषण होईल अशी पोषण मूलद्रव्ये व औषधी गुणधर्म फारसे नसतातच.

**उपयोग :** १. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तहान भागविण्यासाठी कधीतरी तृष्णाशामक म्हणून पेयांचा उपयोग होतो. प्रवासामध्ये तहान लागल्यानंतर स्वच्छ पाणी पिण्यास उपलब्ध नसेल, तर तहान शमविण्यासाठी यांचा उपयोग होतो.

३. खेळाडूंना तत्काळ ऊर्जा मिळण्यासाठी व त्यांचा थकवा घालविण्यासाठी शीतपेयांचा उपयोग होतो.

**सावधानता :** या शीतपेयांचा कधीतरी उपयोग केल्यास शरीरावर जास्त दुष्परिणाम होत नाहीत. जास्त प्रमाणात वापर केल्यास शरीरावर दुष्परिणाम होतात. अनेकजण जेवण करताना आवड म्हणून पाण्याऐवजी शीतपेय पितात. परंतु साखर व कॅफिन या घटकां मुळे भूक कमी होऊन योग्य त्या प्रमाणात आहार घेत पर्यायाने शरीरास आवश्यक असणारी पोषकतत्त्वे आहारातून मिळत नाहीत व आजारांची लागण होते. परंतु यामध्ये असणाऱ्या आहार घेतला जात नाही.

लहान मुले आवडीने शीतपेये पितात; परंतु या शीतपेयांमध्ये असणाऱ्या साखरेचे पचन करण्यासाठी शरीरातील कॅल्शिअम खर्ची पडते व त्यामुळे मुलांच्या हाडांची वाढ व्यवस्थित व योग्य प्रमाणात होत नाही. हाडे ठिसूळ राहतात व उंची वाढण्यावर परिणाम दिसून येतो. समजा एखादे मूल ३५५ मिलि. कोकाकोला पित असेल, तर त्यामध्ये साधारणतः ५० मिलिग्रॅम कॅफिन असते व कृत्रिम साखरही पुष्कळ प्रमाणात असते. हे प्रमाण साधारणत: २ कप कॉफी इतके असते. संशोधनामध्ये असे आढळून आले आहे, की अनेक लहान मुलांमध्ये अस्वस्थता, बेचैनी, निद्रानाश हे विकार अति प्रमाणात शीतपेय पिल्यामुळे निर्माण होतात. कोलामध्ये खूप प्रमाणात फॉस्फेट असते. त्याच्या दुष्परिणामामुळे शरीरातील कॅल्शिअमचे शोषण पुरेसे होत नाही.

या शीतपेयांमध्ये कॅफिन अति प्रमाणात असल्यामुळे त्याचा दुष्परिणाम म्हणून रक्तदाब वाढतो व हृदयाचे ठोके अनियमित होतात. या शीतपेयांमध्ये पौष्टिक घटक फारच कमी असतात. तर दुष्परिणाम करणारी साखर, कृत्रिम गोडवा निर्माण करणारे स्वीटनर, अनैसर्गिक रंग, ॲसिड व कृत्रिम स्वाद तयार करणारे रासायनिक घटक असतात. या रासायनिक घटकां मुळे अनेकांना त्रास होऊ शकतो. काहींना त्वचेवर ॲलर्जी निर्माण होते, तर काहींना पित्ताचा त्रास होतो. या पेयांमधून मिळणाऱ्या उष्मांकांमुळे पौष्टिक अन्नाची भूक कमी होते. कोलासारख्या शीतपेयां मध्ये कॅफिन, फॉस्फेटिक ॲसिड आणि एथिलीन ग्लायकॉल नावाचे गोठणविरोधक रसायन असते.

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# बालरंगभूमी परिषद अहमदनगरतर्फे १५,१६ सप्टेंबरला नाट्यछटा स्पर्धा आणि लोककला महोत्सवाचे आयोजन

नगर - बालरंगभूमी परिषद, मुंबई आयोजित आणि बालरंगभूमी परिषद, अहमदनगर शाखा संचालित जल्लोष लोककलेचा हा लोककला महोत्सव १५,१६ सप्टेंबर रोजी श्री समर्थ विद्या मंदिर सावेडी आणि माउली सभागृह, नगर येथे होणार आहे.

लहान मुलांना लोकवाद्यांची, लोकगीत, लोककलांची ओळख होऊन प्रत्यक्ष यात सहभागी होता यावे व आपली संस्कृती, परंपरा याचे जतन व्हावी, लोप पावत चाललेल्या लोककला पुन्हा मंचावर याव्यात या उद्देशाने बालरंगभूमी परिषदेने हा उपक्रम हाती घेतला आहे.

१५ सप्टेंबर रोजी श्री समर्थ विद्या मंदिर, सावेडी अहमदनगर येथे मानसी भणगे स्मृती नाट्यछटा स्पर्धा घेण्यात येईल, अशी माहिती अध्यक्षा सौ.उर्मिला लोटके यांनी दिली आहे. या स्पर्धा इयत्ता १ ली ते ३ री, ४ थी ते ७ वी आणि ८ ते १० वी अश्या तीन गटात होणार असून सादरीकरणाचा कालावधी गटनिहाय कमीत कमी २ मिनिटे ते जास्तीत जास्त ७ मिनिटे इतका असेल.

स्पर्धेत सहभागासाठी १०० रुपये नाममात्र प्रवेश शुल्क असून प्रत्येक गटासाठी दोन सर्वोत्कृष्ट, दोन उत्कृष्ट आणि दोन उत्तम अशी रोख रक्कम व प्रमाणपत्र असलेली पारितोषिके देण्यात येणार असल्याचे प्रमुख कार्यवाह प्रसाद भणगे यांनी सांगितले. अधिक महितीसाठी शैलेश देशमुख ९८२२९७१२९२, देवीप्रसाद सोहनी ९८८११५४४८९, टिना इंगळे ९८८११५४४८९ यांच्याशी संपर्क साधावा.

दुसऱ्या दिवशी १६ सप्टेंबर रोजी माउली सभागृह येथे 'जल्लोष लोककलेचा' लोककला महोत्सव पार पडणार आहे. यात समूह नृत्य, समूह गीत गायन तर लोककला वैयक्तिकसाठी एकल नृत्य, एकल वाद्य, एकल गायन स्पर्धा महोत्सव होणार असून यात सर्वोत्कृष्ट, उत्कृष्ट आणि उत्तम व प्रशंसनीय पारितोषिके देण्यात येणार आहेत. तसेच सहभागी सर्व बाल कलावंतांना सहभागाबद्दल प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

समुह नृत्य व समुह गायनासाठी सर्वोत्कृष्ट पारितोषिक रुपये ११०००/- रोख सन्मानचिन्ह, उत्कृष्ट ७०००/- आणि उत्तम ५०००/- व प्रशंसनीय रुपये २०००/- पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागासाठी ५००/- रुपये अनामत शुल्क घेण्यात येणार असल्याचे सोनाली दरेकर यांनी सांगितले.

तसेच एकल नृत्य, एकल गीत गायन आणि वाद्य वादन यासाठी सर्वोत्कृष्ट पारितोषिक रुपये ३०००/- रोख सन्मानचिन्ह, उत्कृष्ट २०००/- आणि उत्तम १०००/- व प्रशंसनीय रूपये ५००/- पारितोषिके प्रथम पारितोषिके रुपये ३०००/- रोख रक्कम देण्यात येणार असल्याचे विराज अडगटला यांनी सांगितले.

या स्पर्धा महोत्सवात सहभागासाठी २००/- रुपये अनामत शुल्क असेल. महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी सागर अलचेट्टी : ८९८३९८४९९९ (समूहनृत्य), तेजा पाठक : ९४२०७४९४९७ (समूह गीत), ऋतुजा पाठक : ८४४६४५०७६७ (एकल गीत), श्रिया देशमुख: ८२७५४३८२०२ (एकल नृत्य/वादन) सहभागी होण्यासाठी यांचेशी संपर्क साधावा. महोत्सवात सहभाग नोंदविण्याची अंतिम तारीख १२ सप्टेंबर आहे.

मानसी भणगे स्मृती नाट्यछटा या स्पर्धेचे हे ५ वे वर्ष असून नगर जिल्ह्यासह पुणे, छ.संभाजीनगर, बीड जिल्ह्यातून स्पर्धक येणार असल्याने ह्या वर्षीपासून स्पर्धा 'राज्यस्तरीय' होणार असून मुलांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा. तसेच जल्लोष लोककलेचा या महोत्सवात अहमदनगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त कलाकारांनी सहभागी होऊन आपल्या कलागुणांचे प्रदर्शन बालरंगभूमीच्या व्यासपीठावर करावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती, मुंबईचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके केले.

# ख्रिस्ती युवकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी महामंडळ स्थापन करा

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना समाजाच्या वतीने विविध मागण्या संदर्भात निवेदन



केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना ख्रिस्ती समाजाच्या विविध मागण्या संदर्भात निवेदन देण्यात आले.

नगर - समाजाची आजची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत खालावलेली असून युवकांना रोजगार उपलब्ध नाही तसेच आरोग्य विषयक व शैक्षणिक अनेक समस्या आहेत त्यामुळे ख्रिस्ती समाजासाठी एखादे महामंडळ स्थापन करून समाजाचे प्रश्न तातडीने सोडवावेत. धर्मांध व्यक्तीद्वारे ख्रिस्ती समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा हेतू पुरस्कर प्रयत्न केला जात आहे. तसेच जाणीवपूर्वक पालक वर्ग व समाजातील व्यक्तींना टार्गेट केले जात आहे. यामध्ये खोट्या केसेस दाखल करणे, दमबाजी व दहशत इत्यादी प्रकाराद्वारे चालू असलेल्या प्रकरणाबाबत उच्च स्तरावर योग्य ती दखल घ्यावी व समाजास योग्य तो न्याय मिळवून द्यावा अशी मागणी स्वप्निल शिंदे यांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अमेरिकन मराठी मिशनच्या क्लेरा ब्रूस व बॉईज हायस्कूल येथील शाळेच्या खुल्या मैदानावरील बोगस कागदपत्राच्या आधारे जमीन बळकवणाऱ्यांचा चाललेला प्रकार अत्यंत निंदनीय असून ख्रिस्ती समाजाचा त्यास तीव्र विरोध असून देखील ख्रिस्ती जनसामान्यांच्या विकासाकरिता मिशनरी द्वारे देऊ केलेली जमीन जे कोणी धन दांडगे तसेच समाज विरोधी व्यक्तीद्वारे राजकारनी व्यक्तीला हाताशी धरून खरेदी विक्री केलेले व्यवहार पूर्णपणे बेकायदेशीर असून समाजाला केंद्राकडून योग्य तो न्याय मिळवून द्यावा या मागणीसाठी स्वप्निल शिंदे यांनी ना. रामदास आठवले यांना निवेदन दिले.





हॉटेल कॅसलमध्ये आयोजित कार्यक्रमप्रसंगी रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुरेश साबू, समवेत इतर पदाधिकारी.

# गरजू आणि गरीब घटकांसाठी रोटरी क्लब नेहमीच अग्रणी

### डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुरेश साबू यांचे उद्गार

नगर - रोटरी क्लब नेहमीच समाजातील गरजू आणि गरीब घटकांच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिला आहे. समाज समृद्ध करण्यासाठी रोटरीचे योगदान खरोखरच कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुरेश साबू यांनी केले. ते रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अधिकृत भेटीच्या निमित्ताने बोलत होते.

हा कार्यक्रम हॉटेल कॅसलच्या अत्यंत सुशोभित आणि वातानुकूलित हॉलमध्ये झाला. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या प्रेसिडेंट मीनल बोरा यांनी कार्यक्रमाचे अगत्यपूर्वक आयोजन केले होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी क्लबच्या दिवंगत सदस्या रोटरियन वैशाली कोलते यांना सर्वांनी उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

त्यानंतर, मीनल बोरा यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या दरम्यान, अहमदनगरमधील पहिली महिला रिक्षा चालक नीलिमा खरारे यांना डीजी सुरेश साबू यांच्या हस्ते व्होकेशनल अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, रोटरी क्लबच्या वतीने ए.ई.एस. शाळेसाठी सॅनिटरी पैड वेंडिंग एंड डिस्पोजल मशिन रोटरियन छायाताई फिरोदिया यांच्या तर्फे देण्यात आले.

डीजी सुरेशजींनी आपल्या ओघवत्या भाषेत रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या कार्याचे कौतुक केले आणि स्त्रियांमधील प्रभावी क्षमतेला उत्तेजन देत मार्गदर्शनपर टिप्स दिल्या. या प्रसंगी व्यासपीठावर फर्स्ट लेडी निर्मला साबू, उपप्रांतपाल किरण कारला, आणि डायरेक्टर क्षितिज झावरे उपस्थित होते.

रोटरी क्लब अहमदनगर प्रियदर्शनीच्या सर्व सदस्या, तसेच डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर रो. इश्वर बोरा या कार्यक्रमात उपस्थित होते. नवीन मेंबर्सचे स्वागत करून कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. अनुरिता झगडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सेक्रेटरी स्वाती गुंदेचा यांनी केले.

# दुःखाचे मूळ नष्ट करण्यासाठी प्रतिक्रमण आराधना महत्वाची

### श्रुतमुनिजी म.सा. यांचे प्रतिपादन; आनंदधाम येथे दररोजच्या प्रतिक्रमणात (सामाईक) हजारो भाविकांचा सहभाग



जैन धर्मियातील पवित्र चातुर्मास पर्युषण सुरु असून, या निमित्ताने आनंदधाम येथे पर्वात उपप्रवर्तक ऋतुमुनीजी म.सा. यांच्या उपस्थितीत सुरु असलेल्या आराधनेत सहभागी झालेले भाविक.

नगर - आधुनिक काळात मनुष्य कोणतेही कार्य करताना पापाच्या गोल चक्करमध्ये अडकलेला आहे. कधी श्रीमंत बनण्याच्या शर्यतीत पाप होते तर श्रीमंतीत चैन, मौजमजा करताना पाप होते. कधी श्रीमंती दाखवताना पाप होते तर कधी पाप लपविण्यासाठीही पाप केले जाते. अशा प्रकारे आयुष्याच्या वर्तुळाभोवती पाप फिरत राहते. झाडाचे मूळ खोल जमिनीत अंधारात वाढते आणि जमिनीबाहेर आपल्या फांद्या फुलवते. जर मूळ उखडून प्रकाशात आणले तर ते सुकुन जाते. याचप्रकारे दुःख रूपी झाडाचे मूळ हे पाप आहे. जे अज्ञानाच्या अंधारात वाढते. त्याला ज्ञानाच्या प्रकाशात आणले तर ते सुध्दा सुकुन जाते. दुःखाचे मूळ सुकवायचे तर प्रतिक्रमण आराधना केली पाहिजे, असे मौलिक विचार चातुर्मासानिमित्त आनंदधाम येथे विराजमान उपप्रवर्तक श्रुतमुनिजी म.सा. यांनी दिले आहेत.

जैन धर्मियातील पवित्र चातुर्मासात सध्या पर्युषण पर्व सुरु आहे. यानिमित्त आनंदधाम येथे दररोज सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., श्रुतमुनिजी म.सा. आदी साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात हजारो श्रावक श्राविका प्रतिक्रमण (सामाईक) आराधना करीत आहेत. विशेष म्हणजे शेकडो मुले, मुली नित्यनियमाने यात सहभागी होत आहे.

प्रतिक्रमणाचे महत्व विशद करताना श्रुतमुनिजी म.सा.सांगतात, आत्मा जागृत करणारा, पापांचे वादळ शांत करणारे प्रतिक्रमण हे एक स्टेपिंग स्टोन आहे. जैन धर्माकडे एक वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. जैन धर्मातील प्रत्येक क्रिया तसेच सिध्दांत तार्किक आधारावर आहे. कोणी एक व्यक्ती जेव्हा खोटे बोलते, चुकीचे काम करते, हिंसा करते किंवा कोणत्याही प्रकारचे पाप करते तेव्हा त्याच्या भोवती नकारात्मक ऊर्जेचे वर्तुळ तयार होते. या नकारात्मकते-मुळे त्याच्या हातून कायम चुकीचेच घडते. प्रतिक्रमण या नकारात्मक वर्तुळाला छेद देण्याची ताकद ठेवते. प्रतिक्रमण आत्मा व अंतकरण शुध्द करण्याची प्रक्रिया आहे. प्रसन्नतेची गुरु किल्ली प्रतिक्रमण आहे. याचे नियोजन जैन श्रावक संघ करीत आहे.



श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजमधील आठवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या असेम्ब्लीमध्ये नाट्यछटा सादर करून त्याद्वारे महिला व बालकांवर होणाऱ्या सततच्या अन्यायाच्या विरोधात विचार व्यक्त केले.

# श्री रामकृष्णाच्या विद्यार्थ्यांनी केला स्त्री शक्तीसाठी जागर

नगर - कोलकत्तामधील लेडी डॉक्टरवर झालेल्या अत्याचार व त्या पाठोपाठच बदलापूरमधील घडलेल्या घटनेचे पडसाद सर्वत्र उमटत आहेत. श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेजमधील आठवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या असेम्ब्लीमध्ये नाट्यछटा सादर करून त्याद्वारे महिला व बालकांवर होणाऱ्या सततच्या अन्यायाच्या विरोधात आपले विचार व्यक्त केले. महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्याचारा विरोधातील घोषवाक्यांचे फलक घेऊन घटनेच्या निषेधार्थ काळे मास्क लावून व हातात मेणबत्ती घेऊन रॅली काढण्यात आली. शेवटी श्रद्धांजली वाहण्यात आली. अतिशय मनोरंजक परंतु विद्यार्थ्यांना जागृत करणारे हे नाटक इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यात आले. अन्याय करणाऱ्या बरोबरच अन्याय होता पाहणारे देखील होणाऱ्या घटनेला तितकेच कारणीभूत असतात म्हणून कुठेही अन्याय होत असेल तर मोबाईल घेऊन केवळ त्याचा व्हिडिओ काढत न बसता तो थांबवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा संदेश या नाटकातून देण्यात आला. तसेच प्रत्येक मुली, महिलांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे, असे आग्रहाने सांगण्यात आले.

वर्ग शिक्षिका असो रोथेल लोंढे यांनी विद्यार्थ्यांकडून या कार्यक्रमासाठीची तयारी करून घेतली. श्री रामकृष्णचे संस्थाचालक, पदाधिकारी, मुख्याध्यापक सौ. राधिका जेऊरकर, उपमुख्याध्यापक संपदा देशपांडे, समन्वय सुषमा उजागरे व श्रेयस गुंडू यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# संजय चोरडिया यांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढती



सहाय्यक फौजदार संजय चोरडिया यांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढतीबद्दल त्यांचे जिल्हा पोलीसप्रमुख राकेश ओला यांनी अभिनंदन केले. (छाया - बबलू शेख)

नगर - सहाय्यक फौजदार ते पीएसआय अशी पोलीस अंमलदार यांची पदोन्नती झाल्याबद्दल पोलीस मुख्यालयात जिल्हा पोलीसप्रमुख राकेश ओला यांच्या हस्ते या सर्वांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस उपअधीक्षक (गृह) खेडकर होते.

यावेळी मोटार परिवहनचे पोलीस निरीक्षक पाटील, पोलीस मुख्यालयातील आरपीआय परदेशी उपस्थित होते. कंपनी चालक हेड कॉन्स्टेबल कृष्णा वैरागर, हेड कॉन्स्टेबल मंगेश काळे, हेड कॉन्स्टेबल राजेंद्र कदम, हेड कॉन्स्टेबल मुसा सर, हेड कॉन्स्टेबल अमोल वारे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले.

यावेळी संजय चोरडिया यांच्याबरोबरच अर्जुन चिंचकर, व्हिक्टर जोसेफ, महेश जोशी, संजय चव्हाण, सुनील भिंगारदिवे, सुभाष आव्हाड, संजय वाघमारे, बाबासाहेब गुंजाळ, अरविंद गरड, अर्जुन ढाकणे, विलास जगताप, मुरलीधर आव्हाड, मंजुषा तांदळे या सर्वांना पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती मिळाली आहे. श्री. चोरडिया यांची सुमारे ३३ वर्षे पोलीस खात्यात सेवा झाली असून, जिल्ह्यात विविध ठिकाणी त्यांनी काम केले आहे. अनेक मोठ्या गुन्ह्यांची उकल करण्यात त्यांचा हातखंडा आहे. गुन्हे शोध पथकात काम करीत असताना त्यांनी मोठी कामगिरी केली आहे.



मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त अहमदनगर जिल्हा मराठा सेवा संघाने तपोवन रोडवरील बालघर प्रकल्प येथे निराधार मुलांना अन्नधान्य साहित्याचे वाटप तसेच शालेय साहित्याचे वाटप करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

# मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

नगर - मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिनानिमित्त अहमदनगर जिल्हा मराठा सेवा संघाने तपोवन रोडवरील बालघर प्रकल्प येथे निराधार मुलांना अन्नधान्य साहित्याचे वाटप तसेच शालेय साहित्याचे वाटप करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी जिजाऊ वंदना व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रारंभी प्रास्तविक बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांनी केले तर आभार अमोल लहाने यांनी मानले. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजिनियर सुरेश इथापे, मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर मरकड, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष संपूर्णा सावंत, माजी महापौर शीलाताई शिंदे, स्वाती शेटे, अन्नपूर्णा मॅडम, रेणुका दौंड, मराठा पतसंस्थेचे संचालक बाळकृष्ण काळे, सतीश इंगळे, उदय अनभूले, अच्युत गाडे, कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, मराठा पतसंस्थेचे पदाधिकारी ठोंबरे, विजय नवले, अॅड. मंगेश सोले, माणिक अल्हाट, प्रशांत बोरुडे, महेश रोहकले, तेजस कासार आदीं उपस्थित होते. यावेळी परिसरात मराठा सेवा संघाच्या वतीने वृक्षारोपणही करण्यात आले.

## शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन

नगर - शिक्षक दिनानिमित्त प्रेरणा प्रतिष्ठानच्यावतीने बुधवारी (४ सप्टेंबर) शिक्षकांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. माजी आ. अरुण जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते शिक्षक-शिक्षिकांचा सपत्निक गौरविण्यात येणार असल्याची माहिती संयोजन समितीचे प्रा. माणिक विधाते यांनी दिली.

बुधवारी ४.३० वाजता टिळकरोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात या सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, प्राचार्य खासेराव शितोळे, मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहमदनगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, मुख्याध्यापक शिक्षक समन्वय समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य प्रयत्नशील आहेत.

# कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्यगौरव शीला अनावरण, जीवन चरित्र गौरव ग्रंथाचे ५ सप्टेंबर रोजी नगरमध्ये प्रकाशन

नगर - कर्मवीर वि. रा. शिंदे यांनी लोकमान्य टिळकांपासून ते महात्मा गांधींपर्यंत सर्व समाज सुधारकांसमवेत सेवाभावी कार्य करुन अस्पृश्यता निवारण करण्याचे व दीन दलितांचा आधारवड होऊन भारतीय निर्भय सहाय्यक मंडळी संस्थेची निर्मिती करुन गोरगरीब, वंचितांच्या, अस्पृश्यांच्या दलित वस्तीत आपल्या कुटूंबासह निवासी वास्तव्य केले. त्यांचे प्रगतीसाठी शिक्षणसुविधा शाळा महाविद्यालये काढली व शिक्षणाची दारे खुली केली. वि. रा. शिंदे यांच्या कार्याचे स्मरण म्हणून त्यांचे कार्याच्या गौरवशीलेचे अनावर व जीवन चरित्र ग्रंथाचे प्रकाशन भिंगार येथील रयत शिक्षण संस्थेच्या अॅबट हायस्कूल मध्ये ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी सकाळी १० वाजता करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. दादाभाऊ कळमकर असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. आशुतोष काळे, विशाल शेवाळे, साहित्यिक खासेराव शितोळे, प्राचार्य भि. ना. दहातोंडे, शाहीर अरुण आहेर यांच्यासह 'रयत'चे सदस्य कु. रितु दीदी अॅबट, ज्ञानदेव पांडुळे, नवनाथ बोडखे, प्रमोद तोरणे आदी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती मुख्याध्यापक एन. एस. अनभुले, प्राचार्य पी. एम. तोरणे, पर्यवेक्षक एस. यु. मुठे यांनी दिली आहे.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे भारतीय वंचित, दलित, बहिष्कृत समाजाचे महान उद्धारक होते. १३ एप्रिल १८७३ मध्ये त्यांचा जन्म जमखंडी येथे झाला. पुण्यात आपले शिक्षण पुर्ण केले. बी. ए. एल. एल. बी पर्यंत कायद्याचे शिक्षण घेवून १९०३ मधे मॅन्चेस्टर ऑक्सफर्ड विद्यापीठात भाषा शास्त्र व धर्म विद्येचे व समाजशास्त्राचे शिक्षण घेतले.

१९०३ ते १९०६ संपुर्ण भारतभर भ्रमण करुन अस्पृश्य व बहिष्कृत वर्गांच्या वेदनामय जीवनशैलीचा त्यांनी अभ्यास केला. दरम्यानचे काळात प्रार्थना समाजाचे कार्य करताना, भिंगार (अहमदनगर) येथील अस्पृश्य वर्गाच्या वस्ती मध्ये त्यांना दलितोद्धार कार्याची प्रेरणा मिळाली व तेथील जाहीर सभेत त्यांनी आपले जीवन दलितोद्धार कार्यासाठी समर्पित करणार असल्याची घोषणा केली. भिंगार हे स्थळ त्यांचे सामाजिक कार्याची प्रेरणा भूमी ठरली.

१९२० साली महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे पार पडलेल्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेत महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्ता निवारण या विषयावर प्रबंध लिहून सादर केला व या प्रश्नाला राष्ट्रीय स्वरुप मिळवून दिले.

माझ्या शालेय जीवनापासून वि. रा. शिंदे यांच्या कार्याचा माझ्या मनावर मोठा प्रभाव आहे. माझ्या साहित्यिक कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षपदी मी विराजमान झालो. त्या काळात वि. रा. शिंदे यांचे समग्र साहित्याचे संशोधन करुन प्रसिद्ध केले व भिंगार येथे त्यांच्या प्रेरणास्थळी त्यांचे कार्याची गौरवशीला स्थापित करण्याची घोषणा केली.

विविध अडचणींतून मार्ग काढीत आज ५ सप्टेंबर ह्या शिक्षक दिनाचे औचित्य साधीत महर्षि विठ्ठल रामजी शिंदे या समाज शिक्षकांप्रती ऋणानुबंध मानुन सामाजिक जबाबदारी व कृतज्ञतेच्या भावनेतून त्यांचे जीवन चरित्रावर प्रकाश टाकणाऱ्या साहित्य कृती आणि कार्यगौरवशीलेचा लोकार्पण सोहळा होणार आहे. या कामी मोलाचे सहाय्य माजी आमदार दादाभाऊ कळमकर, रयत शिक्षण संस्था, मॅनेजिंग कमिटी सदस्य, तसेच रितुताई अॅबट, परिमल निकम, प्राचार्य भि.ना. दहातोंडे, प्राचार्य खासेराव शितोळे, रयतच्या शालेय शिक्षण समितीचे पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक व जेष्ठ साहित्यिक शाहीर अरुण आहेर यांनी विशेष सहाय्य केले आहे, असे महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष आचार्य रतनलाल सोनग्रा यांनी म्हटले आहे.

# महायुतीकडून आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानाची वागणूक व सत्तेत सहभाग नाही

## ना. रामदास आठवले यांची खंत; श्रीरामपूरच्या जागेवर आरपीआय ठाम

नगर – विधानसभेत दहा ते बारा जागा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला मिळाव्या अशी मागणी राहणार आहे. महायुतीकडे आरपीआयच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नाही. सत्तेत सहभाग दिला जात नाही. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळाचे विस्तार करताना मंत्रिपद देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्यापि मंत्रिमंडळातही स्थान देण्यात आलेले नाही. रिपब्लिकन हे अभिमानी असून, अपमान करणे योग्य नसल्याचा इशारा केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी दिला आहे. तर श्रीरामपूरच्या जागेवर ठाम असल्याचेही त्यांनी सांगितले.



शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत बोलताना ना. रामदास आठवले व पदाधिकारी.

संविधान सन्मान महामेळाव्यानिमित्त शहरात आलेले ना. आठवले यांची सोमवारी (दि.२ सप्टेंबर) शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद झाली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आरपीआयचे राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे, संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव, राज्य सचिव राजाभाऊ कापसे, प्रभारी दक्षिण जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे, उत्तर महाराष्ट्र सचिव अजय साळवे, किरण दाभाडे, विवेक भिंगारदिवे, नगरसेवक राहुल कांबळे, योगेश त्रिभुवन, अविनाश भोसले, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, गौरव साळवे, बंटी गायकवाड, अजय आंग्रे, बाबा राजगुरु, सतीश मगर, बाळासाहेब शिंदे, विशाल घोडके आदीं उपस्थित होते.

पुढे आठवले म्हणाले की, संविधान मजबूत करणे आवश्यक आहे. संविधान मजबूत झाल्याशिवाय माणूस मजबूत होणार नाही. आणि माणूस मजबूत झाल्याशिवाय देश मजबूत होणार नाही. देशाचे संविधान मजबूत करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. त्याचबरोबर सत्ताधारी व विरोधकांचीही जबाबदारी आहे. संविधान बदलणार, लोकशाही धोक्यात आली आहे! असा अपप्रचार करून विरोधकांनी वातावरण निर्मिती करून मतदान घेण्याचे काम केले. त्यामुळे लोकसभेत महाविकास आघाडीच्या जागा वाढल्या. लोकसभेची पुनरावृत्ती विधानसभेत होऊ नये, यासाठी आंबेडकरी समाजाला न्याय देण्याची भूमिका महायुती सरकारने ठेवावी. महायुतीत नवीन जोडीदार आल्यानंतर आरपीआयकडे लक्ष दिले जात नाही. मात्र यापुढे आरपीआयला ग्राह्य धरून चालणार नाही. आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानाची वागणुक मिळण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी विचार करण्याची भूमिका त्यांनी मांडली.

शिर्डीची जागा मिळाली, असती तर तेथे निवडून आलो असतो. मंत्रीपदाचा उपयोग जिल्ह्याच्या विकासासाठी झाला असता, अशी खंत आठवले यांनी व्यक्त केली. लोकशाही मजबूत होण्यासाठी सत्ताधारी व विरोधकांनी खेळीमेळीच्या वातावरणात राजकारण केले पाहिजे. मात्र महाराष्ट्रात शिव्या शापचे राजकारण सुरू असून, राजकारण बदलत असल्याचे वक्तव्य आठवले यांनी केले. विधानसभेत आरपीआय महायुतीबरोबर ताकदीने उभी राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तर जातनिहाय जनगणनेला समर्थन दर्शवून जातनिहाय जनगणना होणे गरजेचे असल्याची भूमिका मांडून, प्रत्येक जातीची टक्केवारी कळणार असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांचा हिंदू राष्ट्र हा अजेंडा नसून, सबका विकास सबका साथ! या अजेंडा घेऊन ते जनतेपुढे जात असल्याचेही आठवले यांनी सांगितले.

### नवीन जिल्हाध्यक्ष निवडून येत नाही, तो पर्यंत सुनील साळवे प्रभारी जिल्हाध्यक्ष

दक्षिण जिल्हाध्यक्ष पदावरुन संजय भैलुमे यांनी कार्यकारिणी बरखास्त नसून, स्वत: जिल्हाध्यक्ष पदावर कायम असल्याचा दावा केला होता. तर राज्य उपाध्यक्ष वाकचौरे व भालेराव यांनी शहरात बैठक घेऊन कार्यकारिणी बरखास्त करुन सुनिल साळवे यांच्याकडे प्रभारी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली होती. यावरुन पक्षातील आरोप–प्रत्यारोपानंतर गटबाजी चव्हाट्यावर आली होती. ना. आठवले यांच्या पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष पदावरुन प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्यांनी या वादावर पडदा टाकत जिल्हाध्यक्ष पदाची निवडणुक होईपर्यंत प्रभारी जिल्हा अध्यक्ष म्हणून सुनील साळवे राहणार असल्याचे स्पष्ट केले.

आठवले म्हणाले की, अनेक वर्षापासून जिल्हाध्यक्ष म्हणून सुनील साळवे काम करत आहे. इतरांना देखील संधी मिळावी म्हणून सभासद नोंदणी नंतर दोन महिन्यांनी निवडणूक घेतली जाणार आहे. निवडणुकीने नवीन दक्षिण जिल्हाध्यक्ष निवडला जाणार आहे व नवीन कार्यकारणी जाहीर केली जाणार असल्याचे सांगितले.

वाकचौरे व भालेराव यांनी कार्यकारणी बरखास्तच्या घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करुन दक्षिण जिल्हाध्यक्ष पदावरुन सुरू असलेल्या गटबाजीला त्यांनी पूर्णविराम दिला.



पर्युषण महापर्व काळात दाळमंडई येथे जय आनंद फाऊंडेशनच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या मोफत चौविहार (ब्याळू) व्यवस्थेचा शुभारंभ करताना जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आदी.

## पर्युषणपर्वानिमित्त जय आनंद फाउंडेशनच्या मोफत भोजन व्यवस्थेस प्रारंभ

नगर – जैन धर्मातील पवित्र 'पर्युषण महापर्वास' काळास सुरुवात झाली आहे. त्या निमित्त दाळमंडई येथे जय आनंद फाउंडेशनच्यावतीने जैन समाजातील नागरिकांसाठी जेवणाची चौविहार (ब्याळू) मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले.

यावेळी महावीर बडजाते, मनोज शेटिया, डॉ.विजय भंडारी, पोपटलाल भंडारी, फाउंडेशनचे संस्थापक कमलेश भंडारी, अध्यक्ष अमित काबरा, सेक्रेटरी सुदर्शन दिवटे व मिनेश छाजेड, उपाध्यक्ष कुणाल बडजाते व गौतम मुथा आदींसह नागरिक व जय सदस्य उपस्थित होते.

राजेश गुगळे व कमलेश गुगळे यांनी स्वतःची जागा यासाठी उपलब्ध करून देत सहकार्य केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहित चुत्तर यांनी केले. सीए किरण भंडारी यांनी आभार मानले. यावेळी जय आनंद फाउंडेशनचे सदस्य आणि लुंकड, रितेश पारख, स्वप्नील गांधी, संजय सुराणा, सुमित लोढा, संजय सुराणा आदींसह सदस्य उपस्थित होते.



माळी महासंघ अहिल्यानगर दक्षिण जिल्हापदी भूषण भुजबळ यांची निवड झाल्याबद्दल भिंगार बांधकाम सप्लायर्स व योगेश घाडगे मित्र मंडळ, मळथडी मित्र मंडळ, भूषण भुजबळ मित्र मंडळ, भुजबळ परिवारच्या वतीने भुजबळनगर नागरदेवळे रोड येथे सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शरद झोडगे, अण्णा चौधरी, महेश झोडगे, श्याम बोळे, संजय पांढरे उपस्थित होते. फटके वाजून निवडीचे स्वागत करून सत्कार करण्यात आला.



**शासनाच्या महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महोत्सव अशासकीय जिल्हा समितीच्या सदस्यपदी यश शहा यांची नियुक्ती**

महा. शासनाच्या भ.महावीर स्वामी निर्वाण कल्याणक महोत्सव–अशासकीय जिल्हा समिती सदस्य पदी इंजि.यश शहा यांची मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या आदेशाने नियुक्ती करण्यात आली.

## महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा समितीवर नगरचे सुदर्शन डुंगरवाल यांची नियुक्ती

नगर – महाराष्ट्र राज्य शासनाने भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक वर्षानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. यात अहमदनगर जिल्हा समिती सदस्यपदी भाजप जैन प्रकोष्ठ सेलचे प्रदेश सचिव, केंद्रीय मध्य रेल्वे सल्लागार समिती (मुंबई) सदस्य सुदर्शन डुंगरवाल यांची निवड करण्यात आली आहे. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.





**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळायलाच हवा**

प्राचीन काळापासून चालत आलेल्या समृद्ध परंपरा असलेल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातुन केंद्र सरकारकडे ठोस प्रयत्न करावेत व गेल्या अनेक वर्षांपासून राज्याची मागणी असलेल्या मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळून न्याय द्यावा असे निवेदन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह, शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य जयंत येलुलकर यांनी शालेय शिक्षण तथा मराठी भाषा मंत्री दिपक केसरकर यांना भेटून दिले.

## माहेश्वरी पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी ॲड. महेश काबरा यांची नियुक्ती

नगर – अहमदनगर येथील माहेश्वरी पंच ट्रस्ट या संस्थेची विश्वस्त व कार्यकारिणी सभा २९ ऑगस्ट रोजी महेश मंगल कार्यालय येथे झाली. त्यात आगामी वर्ष २०२४–२५ करीता नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणुन वरिष्ठ विधीज्ञ ॲड. महेश श्रीनिवास काबरा यांची सर्वानुमते निवड झाली.



सभेस संस्थेचे विश्वस्त उद्योगपती मोहनलाल मानधना, शामसुंदर जाखोटीया, मदनलाल मालपाणी तसेच नगर तालुका अध्यक्ष मुकुंद धुत व निरंजन सेवाभावी संस्थेचे अतुल डागा, सचिव रविकांत काबरा, सहसचिव श्रीनिवास सारडा, कोषाध्यक्ष बजरंग दरक, सदस्य विजय जाखोटीया उपस्थित होते.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार नगर येथील अनुरिता झगडे यांना जाहीर

नगर – हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला आहे. गेल्या २३ वर्षापासून शैक्षणिक कार्यात दिलेल्या विशेष योगदान व उत्कृष्ट कार्याबद्दल तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्य, कला, पत्रकारिता व प्रेरणादायी व्याख्याता क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेतर्फे शिक्षक दिनानिमित्त व सहावे राज्यस्तरीय काव्य संमेलनानिमित्त आयोजित कार्यक्रमात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत मुख्याध्यापिका पुरस्कार देऊन प्रा.अनुरीता झगडे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.



पुरस्कार वितरण सोहळा ८ सप्टेंबर रोजी परिवार मंगल कार्यालय, निमगांव वाघा, ता.जि.अहमदनगर येथे सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती पै.नाना डोंगरे यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी बाळासाहेब केदारे

नगर – टिळक रोड श्रमिक कार्यालय येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे झालेल्या समाज जन जागृती व जन संवाद मेळावा मध्ये राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार तसेच प्रदेशाध्यक्ष शांताराम कारंडे, माधवराव गायकवाड, महिला राष्ट्रीय सचिव सरोज बिसुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे महासचिव ज्ञानेश्वर कांबळे, युवक प्रदेशाध्यक्ष रवींद्र खैरे, अमर तांडेकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप कानडे, राज्य युवक सचिव संतोष कांबळे, राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, राज्य कार्यकारणी सदस्य शोभाताई कानडे आदीसह बांधव उपस्थित होते.



या मेळाव्यात बाळासाहेब केदारे यांची जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली.



राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या नगर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल टिळक रोड श्रमिक कार्यालयात बाळासाहेब केदारे यांचा सत्कार करताना प्रदेशाध्यक्ष शांताराम कारंडे आदी.

## स्नेहबंध फौंडेशनतर्फे नगरमध्ये जिल्हास्तरीय गौरी आरास स्पर्धा

नगर – स्नेहबंध फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय उत्कृष्ट गौरी आरास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे महिला सशक्तिकरण, पर्यावरण, पाणी बचत, प्लास्टिकमुक्ती हे विषय ठेवण्यात आले आहेत. या विषयाला अनुसरून स्पर्धकांनी आपल्या गौरी–गणपतीच्या समोर केलेल्या देखाव्याचा एक मिनिटांचा व्हिडीओ व ३ ते ४ फोटो स्नेहबंध सोशल फाउंडेशनकडे सादर करावा.



या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी आपले व्हिडीओ संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे ८७९३ १९ १९ १९ या क्रमांकावर १२ सप्टेंबर पर्यंत पाठवावेत. स्पर्धेत ज्या कुटुंबांना सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे.

डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून पहिल्या तीन आराशींना गौरवण्यात येणार आहे. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे.


## जाहीर प्रगटनास उत्तर

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनास उत्तराद्वारे कळविण्यात येते कि, खालिल परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीबाबत नवा मराठा या वर्तमानपत्रात दि. ३१/०८/२०२४ रोजी शेख इम्रान अयाज रा. दक्षिणमुखी हनुमान मंदिर जवळ, सर्जेपुरा, अहमदनगर यांच्यातर्फे ॲड समीर वखारे यांनी प्रसिध्द केलेले जाहीर प्रगटन आमचे आशिल हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हूजेफा सालुजी तसेच नदिम दाउद शेख व आसमा नदिम शेख यांच्या वाचन्यात आली आहे सदरच्या जाहिर प्रगटन मध्ये केलेले कथन खोटे व लबाडीचे असुन बेकायदेशिर असे आहे व आमच्या आशिल यांना मुळीच मान्य व कबुल नाही.

मिळकत सि.स.क्र. ६४४८ एकुन क्षेत्र. २३६. ६ चौ.मी ही सुरुवातीस शेख इमाम मजिद व शेख यासिन मजिद तसेच मयत शेख महेबुब मोहम्मद व इतर यांच्या मालकी वहिवाटीची मिळकत होती तदनंतर सदरची मिळकत सौ. नजमा मोहम्मद शेख यांनी मिळकतीचे मालक शेख यासिन शेख मजीद यांच्या कडुन त्यांचा कायदेशिर असलेला हिस्सा क्षेत्र ६९.७० चौ. मी हा दि. २०/०२/१९९२ रोजी खरेदी केला होता तसेच लियाकत मोहम्मद शेख व समीर मोहम्मद शेख यांनी शेख इमाम शेख मजिद यांच्या कडुन त्यांचा असलेला हिस्सा क्षेत्र. ६९.७० चौ. मी तसेच लियाकत मोहम्मद शेख व समीर मोहम्मद शेख यांनी फकरुन्निसा शेख महेबुब व इतर यांच्यापासुण त्यांचा असलेला हिस्सा सण २००७ रोजी रजि. खरेदीकताच्या दस्ता अनव्ये खरेदीचा संपुर्ण मोबदला देउन खरेदीखत करुन घेतलेले होते व आहे व त्यानुसार मिळकतिच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्कासदरी सौ. नजमा मोहम्मद शेख, लियाकत मोहम्मद शेख, समीर मोहम्मद शेख यांचे नाव खरेदीखता अनव्ये लागलेले होते व आहे.

सौ. नजमा मोहम्मद शेख यांच्या मृत्युनंतर मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्कासदरी त्यांचे कायदेशिर वारस म्हणुन मोहम्मद इमाम शेख, लियाकत मोहम्मद शेख, समीर मोहम्मद शेख व तबस्सुम फारुक शेख यांचे नाव लागलेले होते व आहे.

सण २०१४ मध्ये शेख मोहम्मद इमाम व इतर तीन यांनी मिळकतीपैकी ६९.७० चौ. मी क्षेत्र रजि. खरेदीखताच्या दस्ता अनव्ये सुमैय्या समीर शेख व शहेनाज लियाकत शेख यांना खरेदी दीली होती व आहे. व खरेदीखता अनव्ये सुमैय्या समीर शेख व शहेनाज लियाकत शेख यांच्या नावाची नोंद फेरफार नं. १२२०५ प्रमाने मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला लागले होते व आहे.

सण २०१३ साली लियाकत मोहम्मद शेख व इतर यांनी नगर भुमापन अधीकारी यांच्याकडे अर्ज देउन त्यांनी खरेदी केलेल्या क्षेत्राची पोट हिस्सा मोजनी करिता अर्ज दिला व अर्जा अनव्ये व मोजनी रजिस्टर न.२०५/२०१३ अनव्ये सि.स.न. ६४४८/९ करीता मुळ मिळकत पत्रिका कायम ठेवुन दि. २९/०७/२००९ व ११/०९/२०१३ चे नोंदीतील धारकाचे नावे कमी करुन सि.स.न. ६४४८/२ चे क्षेत्र. १६०.४० चौ.मी नविन मिळकत उघळनेत येउन क्षेत्र/धारक दाखल केले.

तद्नंतर मिळकत सि.स.क्र. ६४४८/१ व सि.स.क्र. ६४४८/२ हे विभक्त झाले आहे त्यामुळे शेख इम्रान अयाज यांचा सि.स.क्र. ६४४८/२ या मिळकतीशी कोणताही हितसंबंध, हक्क व अधिकार राहिलेला नव्हता व नाही. लियाकत मोहम्मद शेख व इतर यांनी महानगरपालिका अहमदनगर यांच्याकडे रितसर अर्ज देउन मिळकत सि.स.क्र. ६४४८/२ वर बांधकाम करने करिता रितसर परवाणगी घेतली होती व आहे तसेच लियाकत मोहम्मद व इतर यानी दि. १३/१०/२०१४ रोजी मोनालिस हाइट्स अपार्टमेंटचे महाराष्ट्र ओवनरशीप अपार्टमेंट ॲक्ट १९७० अनव्ये डिड ऑफ डिक्लेरेशन ची नोंदणी दस्त क्र. ४२००/२०१४ अनव्ये नोंदविले आहे.

आमचे आशिल हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सलुजी यांनी सि.स.क्र.६४४८/२ मधिल मोनलिस हाइट्स मधिल दुकान नं १ ते ६ ही लियाकत मोहम्मद शेख व इतर तीन यांच्याकडुन दि. २८/०७/२०१९ रोजी संपूर्ण भरणा देउन दुय्यम निबंधक यांच्याकडे खरेदिखताचा दस्त लिहुन नोंदुन घेतलेला आहे. सदरहु खरेदिखताच्या नुसार मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्क सदरी आमचे आशिल हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी यांचे नाव फेरफार क्र. २५७४० अनव्ये लागलेले आहे.

तसेच आमचे आशिल नदीम दाउद शेख व आसमा नदीम शेख यांनी देखिल दि.१८/१२/२०१९ रोजी दस्त क्र. १८७/२०२० अनव्ये सि.स.क्र.६४४८/२ मोनलिस हाइटस या इमारतीमधिल फ्लॅट न. १ त्याचे बांधकाम क्षेत्र.१००.५५ चौ. मी. ही मिळकत खरेदिखताचा संपूर्ण भरणा देउन शेख लियाकत व इतर तीन यांच्या कडुन खरेदी घेतलेली होती व आहे. सदरहु खरेदिखताच्या नुसार मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राइटला मालकी हक्का सदरी आमचे आशिल नदीम दाउद शेख व आसमा नदीम शेख यांचे नाव फेरफार क्र. २५७३९ अनव्ये लागलेले आहे.

त्यामुळे शेख इम्रान अयाज व त्यांच्या कुटुंबाचा मिळकत सि.स.क्र. ६४४८ / २ मध्ये कोणताही हक्क, अधिकार व हितसंबंध राहिलेला नव्हता व नाही तसेच मिळकत ६४४८/२ या मिळकतीस लिझ पेंडिंसी ची नोंद रद्द झालेली आहे. तसेच इम्रान अयाज शेख व इतर यांनी शेख लियाकत मोहम्मद व इतर यांच्या विरुध्द मिळकती बाबत दाखल केलेला दाव क्र.४१५/२०१४ हा मे. कोर्टाने दि. २७/११/२०१७ रोजी रद्द केलेला आहे.

आमचे आशिल हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी तसेच नदिम दाउद शेख व आसमा नदीम शेख हे खरेदीखता अनव्ये मालक झालेले होते वा आहे व मिळकतिचे टाइटल देखिल क्लियर आहे. आमच्या आशिलास त्यांनी खरेदी केलेली मिळकत हस्तांतर करन्याचा पुर्ण कायदेशिर अधिकार आहे. केवळ पैसे उकळन्याच्या दृष्ट हेतुने सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द केले आहे. व लोकांची दिशाभुल होवु नये म्हणुन सदरचे जाहिर प्रगटनास उत्तर असे.

**मिळकतीचे वर्णन:**

अ. डि. अहमदनगर, सब. डि. नगरपैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दितील शहर नगर येथिल सर्जेपुरा भागातील सिटी सर्व्हे न. ६४४८/२ क्षेत्रफळ १६०.४० चौ.मी यावर बांधलेले मोनलीस हाइट्स यापैकी ग्राउंड फ्लोअर वरिल शॉप नं १ ते ६.

ब. डि.अहमदनगर, सब.डि. नगरपैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दितील शहर नगर येथिल सर्जेपुरा भागातील सिटी सर्व्हे न. ६४४८/२ क्षेत्रफळ १६०.४० चौ.मी यावर बांधलेले मोनलीस हाइट्स यापैकी फर्स्ट फ्लोअरमधील फ्लॅट नं.१ याचे बिल्ट अप क्षेत्र १००.५५

दिनांक : ०३/०९/२०२४
ठिकाण : अहमदनगर

**ॲड. फारुक बी. शेख**
मो.क्र.९८२२६२२७०५

**ॲड. नुमेर एफ. शेख**
मो.क्र.८०८७८६९४२३

ऑफीस : मिसाळ गल्ली, तेलिखुंट, अहमदनगर



## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत देऊळगाव सिद्धी ता. नगर जि. अहमदनगर यांच्या कडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळवण्यात येते कि, ग्रामपंचायत देऊळगाव सिद्धी ता. नगर, अंतर्गत खालील काम करण्यासाठी सीलबंद लिफाफ्यात ब– १ निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा जिल्हा परिषद कडील नोंदणीकृत ठेकेदार यांनी दि. ०४/०९/२०२४ ते ११/०९/२०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ग्रामपंचायत कडे दाखल करावे.

| अ. नं. | कामाचे नाव | निविदा विक्री रक्कम | बयाना रक्कम | निविदा रक्कम | योजनेचे नाव | कंत्रादार वर्ग | काम पूर्ण करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथील गावठाण अंगणवाडीस तार कंपाउंड करणे | २३६/– | ०.०० | १४८०७५/– | १५ वा वित्त आयोग सन २०२३–२४ | सु.बे. अभियंता (स्थापत्य) | ०३ महिने |
| २ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथील ग्रामपंचायत कार्यालयास फर्निचर करणे | २३६/– | ०.०० | ८२९७२/– | १५ वा वित्त आयोग सन २०२०–२१ | सु.बे. अभियंता (स्थापत्य) | ०३ महिने |
| ३ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथे सार्वजनिक शोषखड्डा करणे | २३६/– | ०.०० | २०५०९/– | १५ वा वित्त आयोग सन २०२०–२१ | सु.बे. अभियंता (स्थापत्य) | ०३ महिने |
| ४ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथे शौचालय बांधकाम करणे | २३६/– | ०.०० | ४१७३१/– | १५ वा वित्त आयोग सन २०२०–२१ | सु.बे. अभियंता (स्थापत्य) | ०३ महिने |
| ५ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथे बाबा पाडोळकर घर ते वाघमोडे शाळा बंदिस्त गटार करणे | ५९०/– | ४१८५/– | ४१८५७२/– | १५ वा वित्त आयोग सन २०२१–२२ | खुला(स्थापत्य) | ०३ महिने |
| ६ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथील प्राथमिक शाळा गावठाण येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे | २३६/– | १६४०/– | १६४०२६/– | १५ वा वित्त आयोग सन २०२३–२४ | खुला(स्थापत्य) | ०३ महिने |
| ७ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथे मागासवर्गीय वस्तीत पथदिवे बसविणे | २३६/– | १४९७/– | १४९७७२/– | १५ वा वित्त आयोग सन २०२२–२३ | खुला (इलेक्ट्रिकल) | ०३ महिने |
| ८ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथील जि. प. शाळा इमारत रेनवॉटर हार्वेस्टिंग काम करणे | २३६/– | ०.०० | ५७६८३/– | १५ वा वित्त आयोग सन २०२३–२४ | सु.बे. अभियंता (स्थापत्य) | ०३ महिने |
| ९ | मौजे देऊळगाव सिद्धी ता. नगर येथील जि.प.शाळा रामवाडी शौचालय बांधकाम करणे | २३६/– | २५३७ | २५३७७८/– | स्वच्छ भारत मिशन व १५ वा वित्त आयोग सन २०२४–२५ | खुला(स्थापत्य) | ०३ महिने |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी बाबत ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात दि. ०४/०९/२०२४ ते ११/०९/२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा दि.११/०९/२०२४ पर्यंत सायंकाळी ठीक ०५.०० वाजे पर्यंत स्वीकारण्यात येतील. निविदा उघडण्याची प्रकिया शक्यतो दि. १२/०९/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय देऊळगाव सिद्धी ता. नगर येथे पार पडेल. तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा स्वतंत्र असावा. सर्व कामाच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील. कामाचे देय काम पूर्ण झाले नंतर मोजमाप पुस्तकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल. कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता, पंचायत समिती नगर यांचे राहील निविदा मंजूर – नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत देऊळगाव सिद्धी ता. नगर ने राखून ठेवला आहे. आवश्यक प्रमाणपत्र ;– १) जि. प. नोंदणी प्रमाणपत्र २) पॅन कार्ड ३) जि.एस.टी. प्रमाणपत्र. ४) आधार कार्ड ५) कागदपत्र सत्यता पडताळणी बाबत विहित नमुन्यात १०० रुच्या मुद्रांकवर घोषणापत्र जोडून द्यावे.

**ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत देऊळगाव सिद्धी ता. नगर

**सरपंच/उपसरपंच**
ग्रामपंचायत देऊळगाव सिद्धी ता. नगर



## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री कानिफ गोरक्ष जपकर व सौ. रोहिणी कानिफ जपकर दोघे रा. मु पो नेप्ती ता. जि. अहमदनगर यांनी सांगितल्यावरुन व दिलेल्या माहितीवरुन खालील वर्णनांच्या मिळकतीबाबत व्यवहार ठरलेला आहे गट नंबर ६४६ / २ ही शेतजमीन असून, सदर शेतजमीनीला जाणे–येणेसाठी स्वतंत्र मालकीचा गट नंबर ६४३ मधून ०हे. ०५ आर क्षेत्राचा रस्ता आहे. सदर मिळकत पुर्णताः निर्वेध असून, हल्ली कुठल्याही प्रकारचा चालू वाद नाही तसेच स्टेट बँकेच्या असलेल्या बोजाचे खरेदीखतापुर्वी निराकारण केले जाईल असे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, मनाई हुकूम, स्थगिती, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०३/०९/२०२४**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगरपैकी, जिल्हा परिषद हद्दीतील मौजे चास येथील खालील वर्णनाची मिळकत–

| | गट नंबर | क्षेत्रफळ हे . आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| अ) | ६४६/२ | १ . ९९ | २ . ३६ |
| | | पोट खराबा ० . ०१ | |
| | | एकूण २ . ०० | |

ही संपूर्ण शेतजमीन झाडे, झुडूपासह मिळकत विहिर पाणी हक्कासह.

यांसी चतु:सीमा –
पुर्वेस – गट नंबर ६४५ | दक्षिणेस – गट नं. ६३९,६४०
पश्चिमेस – लागू गट नंबर | उत्तरेस – गट नंबर ६४३ मधून असलेला रस्ता.

| | गट नंबर | क्षेत्रफळ हे . आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ब) | ६४३ | ६ . ८३ | ८ . ५० |

यापैकी बांधालगतचे (फक्त रस्त्यासाठी) असलेले क्षेत्र ० हे. ०५ आर (पाच आर).

यांसी चतु:सीमा –
पुर्वेस – गट नंबर ६४३ पैकी | दक्षिणेस – गट नं. ६४७ पैकी
पश्चिमेस – शिवार रस्ता | उत्तरेस – गट नंबर ६४६ / २

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**सौ. सविता मोहनराव कदम**
रा. पारगल्ली, माळीवाडा, अहमदनगर.

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहमदनगर

# कुरकुरीत ब्रेड भजी



मित्रांनो, संध्याकाळी चहासोबत तुम्ही छानपैकी ब्रेडची भजी खाऊ शकता. ही कुरकुरीत भजी संध्याकाळच्या वेळी पोटभरीची ठरतील.

**सामग्री:** चार ब्रेड स्लाईस, अर्धा कप दही, पाउण कप बेसन, वाटलेली हिरवी मिरची एक चमचा, थोडी कोथिंबिर, चवीनुसार मीठ, तेल

**कृती:** ब्रेड स्लाईसच्या कडा कापून घ्या. उरलेल्या ब्रेडचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका भांड्यात बेसन, मिरची, दही आणि मीठ घालून घट्टसर पीठ बनवून घ्या. त्यात ब्रेडचे तुकडे घाला. आता कढईत तेल गरम करायला ठेवा. आता चमच्याने हे मिश्रण हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. कुरकुरीत आणि खमंग ब्रेड भजी चहासोबत खा.

झटपट रेसिपी

# स्टायलिश लूकसाठी...

आजच्या काळात बहुतेक तरुणांना दाढी ठेवून स्टाईलिश लुक करायला आवडते. काहींना सेलेब स्टाईल फॉलो करायला आवडते. सेलेब्सबद्दल बोलायचे झाले तर अशा स्टार्समध्ये अभिनेता रणवीर सिंगचे नाव प्राधान्याने घेतले जाते. रणवीर सिंगच्या मिशा आणि दाढीच्या स्टाईलपासून प्रेरणा घेऊन अनेकांनी त्याच्या स्टाइलची कॉपी केली आहे.



बहुतेक जण दाढी-मिशा एकत्र ठेवण्यास प्राधान्य देतात. या पद्धतीमुळे तुम्हाला स्टायलिश लुक मिळू शकतो, पण लूक मेंटेंन करणे थोडे कठीण आहे. दाढी-मिशीची काळजी न घेतल्यास केस पांढरे होणे, खाज येणे आणि इतर समस्या उद्भवू शकतात.

ग्रुमिंग

मिशा ट्रिम करताना चुकूनही ओल्या करू नका. मिशा ओल्या करून कापणे सोपे असू शकते. परंतु केस कोरडे होतात तेव्हा त्यांचा खरा आकार दिसू लागतो. ही चूक तुमच्या दाढीचा लुक खराब करू शकते. त्यामुळे मिशी ट्रिम कराल तेव्हा ती कोरडी असावी.

अनेकदा असे घडते की दाढी आणि मिशा वाढवण्यासाठी त्यांना ट्रिम किंवा कट करत नाहीत. या स्थितीत केस उलटे वाढू लागतात आणि स्टायलिश लुकही मिळत नाही. केवळ दाढी आणि मिशा वाढवणे पुरेसे नाही तर त्यांना आकार देणे देखील आवश्यक आहे.

असे म्हणतात की केस कापल्याने त्यांची वाढ सुधारते. मिशा आणि दाढी किमान चार आठवड्यांनंतर कट करणे आवश्यक आहे.

लोक घरात असलेला कंगवा केसांमध्ये वापरतात, पण दाढीला ते गांभीर्याने घेत नाहीत. तसेच, मिशा सेट करण्यासाठी तुम्ही दाढीच्या कंगव्याची मदत घेऊ शकता. यासाठी मिशीला जेल लावा आणि दाढीच्या कंगव्याने पसरवा. असे केल्याने जेल व्यवस्थित पसरू शकेल आणि केसांनाही इजा होणार नाही.

डोक्याच्या केसांप्रमाणेच दाढी आणि मिशांच्या केसांना देखील पोषण आवश्यक आहे, कारण यामुळे त्यांची वाढ सुधारू शकते. तुम्ही तुमच्या दाढी आणि मिशांच्या केसांना पोषण देण्यासाठी तेल लावू शकता. आठवड्यातून एकदा या दाढीला चांगली तेलाने मालिश केल्याने, दाढीचे केस छान होतात.




# कोल्हापूरचा पठ्ठ्या!

**आपल्या खेळातून देशासाठी पदक जिंकणं, हे प्रत्येक खेळाडूचं स्वप्नं असतं. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो खेळाडू जीवापेक्षा जास्त कष्ट घेतो. आणि एक दिवस या सर्व कष्टाचे चीज होतं. महाराष्ट्राच्या मातीतल्या स्वप्निल कुसाळेने पॅरिसच्या धरतीवर कांस्यपदक जिंकून देशभरातील जनतेची वाहवा मिळवली.**

मूळचा कोल्हापूरचा असलेल्या नेमबाज स्वप्नील कुसळेने ५० मी. रायफल थ्री पोझिशनच्या पुरुष गटात कांस्यपदक जिंकले. रेल्वेत नोकरी करण्यापासून ते ऑलिम्पिक विजेतेपद मिळवण्यापर्यंतचा त्याचा प्रवासही रंजक आहे. पदक मिळवण्यासाठी १२- १३ वर्षांची तपश्चर्या तो कधीही विसरणार नाही, असं त्याच्या वडिलांनी सांगितलं. स्वप्निलचा ऑलिम्पिकपर्यंतचा प्रवास खूपच रंजक आहे. अभिनव बिंद्राला २००८ च्या ऑलिम्पिकमध्ये खेळताना पाहण्यासाठी स्वप्निलने १२वीच्या परिक्षेकडे कानाडोळा केला. २००९ मध्ये वयाच्या १४व्या वर्षी त्याच्या वडिलांनी स्वप्निलला महाराष्ट्र सरकारच्या क्रीडा प्रबोधिनी योजनेत दाखल केले. तिथूनच त्याचा क्रीडा क्षेत्रातील प्रवास सुरू झाला.

सुरुवातीच्या काळात त्याने नेमबाजीतील आपले कौशल्य विकसित करण्यासाठी पुण्याला जाण्यापूर्वी नाशिकमध्ये प्रशिक्षण घेतले. २०१२ पासून आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. स्वप्निलने एमएस धोनीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे. धोनी तिकीट कलेक्टर होता, त्याचप्रमाणे स्वप्नील देखील मध्य रेल्वेमध्ये तिकीट कलेक्टर म्हणून काम करतो. भारताचा हा प्रतिभावान नेमबाज महेंद्रसिंग धोनीच्या व्यक्तिमत्त्वाने खूप प्रभावित आहे. धोनी क्रिकेटच्या मैदानावर त्याच्या शांत स्वभावासाठी ओळखला जातो, तर शूटिंगसाठी देखील शांत आणि संयमशील स्वभावाची आवश्यकता असते. त्यामुळेच स्वप्नील धोनीचे आणि त्याचे आयुष्य सारखेच असल्याचे सांगतो. या २८ वर्षीय नेमबाजाची जीवनकहाणी भारतीय क्रिकेटपटू एमएस धोनी याच्या आयुष्यासारखीच आहे. तो म्हणतो, मी नेमबाजीच्या जगात कोणत्याही विशिष्ट खेळाडूला फॉलो करत नाही. शूटिंगच्या बाहेरच्या जगात धोनीचे व्यक्तिमत्त्व मला भावते.

स्वप्नीलने २०१२ मध्ये त्याच्या आंतरराष्ट्रीय शूटिंग करिअरला सुरुवात केली. त्याचे वडील आणि भाऊ दोघेही शिक्षक आहेत आणि त्याची आई कांबळवाडी गावची सरपंच आहे. नववीत असताना त्याला सायकलिंग की रायफल यापैकी एकाची निवड करण्यास सांगितले आणि त्याने रायफल उचलली होती. पहिल्यांदा त्याला रायफल दिली तेव्हा त्याने १० पैकी नऊ शॉट्स अचूक मारले. तेव्हा त्याला बंदुक माहीतही नव्हती, असे त्याचे वडील सांगतात. शिवाय पिस्तुल हा खर्चिक खेळ आहे आणि त्याचे दडपण वडिलांनी कधीच स्वप्नीलवर येऊ दिले नाही. ते सांगतात,''२०१२ मध्ये त्याची जर्मनीतल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आणि तेव्हा दीड लाखाचं कर्ज घेऊन त्याला पाठवलं. त्या स्पर्धेत चांगली कामगिरी करता आली नाही. पण, त्याने पुन्हा कसून सराव केला आणि २०१५ मध्ये १८ पेक्षा कमी वय असताना केरळमध्ये खुल्या गटात रौप्यपदक जिंकले''.

अचिव्हर

यापूर्वी २०२३ मध्ये चीनमधील आशियाई क्रीडा स्पर्धा, २०२२ मध्ये बाकू येथील विश्वचषक आणि २०२१ मध्ये नवी दिल्ली इथं नेमबाजीत स्वप्नील हा सुवर्णपदकाचा मानकरी ठरला होता. याशिवाय त्याने २०१५ ते २०२३ या कालावधीत विविध नेमबाजी स्पर्धेत रौप्य आणि कांस्य पदकं जिंकली आहेत.

तब्बल ७२ वर्षांनी कोल्हापूरच्या खेळाडूंनी ऑलम्पिक मध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारात पदक मिळवले. १९५२ मध्ये हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिपिक स्पर्धेमध्ये खाशाबा जाधव यांनी कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक पटकावले होते. तर स्वप्निलच्या विजयानंतर यंदा पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला कांस्यपदक मिळाले आहे. ऑलिंपिकच्या इतिहासातील भारताचे नेमबाजीतील हे सातवे पदक आहे.




## शेर की जुबानी

जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो,
याद हमें रखना चाहे पास हम न हो।

कभी रात में तारे गिनके देख लेना,
जितना तुम गिन पाए उतना
तुम हमें यात करते हो,
और जितने तारे बच जाए
उतना हम तुमको याद करते हैं।

तारों में अकेला चांद जगमगाता है,
मुश्कीलों में अकेला इन्सान
डगमगाता है, कांटो से मत
घबराना मेरे दोस्त, क्योंकी काटों
में भी गुलाब मुस्कुराता है।

## स्मार्ट ट्रिक्स


### हटके फोटोंसाठी...



फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सोशल साईट्वर अपलोड झालेले फोटो आपण बघतो. इफेक्ट्स दिल्याने हे फोटो आकर्षक वाटतात. दोस्तांनो, तुम्ही स्मार्टफोनने छान छान फोटो काढू शकता. छोट्या ट्रिक्सनी भन्नाट इफेक्ट्स देऊ शकता. बॅक कॅमेऱ्याच्या लेन्सवर पाण्याचा एक थेंब टाकून मायक्रो लेन्सचा इफेक्ट मिळवता येईल. खूप जवळून फोटो काढायचा असेल तर ही युक्ती वापरता येईल. भरपूर प्रकाश असणाऱ्या ठिकाणाचा फोटो काढायचा असेल तर गॉगलचा फिल्टर म्हणून वापर करा. फ्लॅश लाईटचा वापर करूनही तुम्ही मस्त इफेक्ट मिळवू शकता.

## बी अलर्ट

### तुटक्या स्क्रीनगार्डमुळे...



स्मार्टफोनच्या स्क्रीनवर बसवलेला स्क्रीनगार्ड तुटल्यानंतरही बरेच जण तो बदलून घेत नाहीत. मात्र अशा प्रकारे तुटलेला स्क्रीनगार्ड धोकादायक ठरू शकतो. तुटका स्क्रीनगार्ड लागून बोट कापण्याची शक्यता वाढते. तुटक्या स्क्रीनगार्डमुळे टचस्क्रीन खराब होऊ शकतो. स्क्रीनगार्ड नसल्यास मोबाईलचा प्रकाश थेट डोळ्यांवर पडून डोळे खराब होऊ शकतात. स्क्रीनगार्डमुळे मोबाईलचा स्क्रीन सुरक्षित रहातो. पण स्क्रीनगार्डच तुटला तर फोनच्या मुख्य स्क्रीनला धोका निर्माण होऊ शकतो.

## स्मार्ट टिप्स

### रिकव्हर युवर फोटोज



स्मार्टफोनमधले फोटो गूगल फोटोजमध्ये स्टोअर केले जातात. काही वेळा एखादा फोटो डिलिट होतो. हा फोटो रिकव्हर करता येतो. म्हणजेच पुन्हा मिळवता येतो. यासाठी गूगल फोटोज ओपन करा. यानंतर खालच्या बाजूला स्क्रॉल करून लायब्रेरीवर क्लिक करा. इथे तुम्हाला ट्रॅश फोल्डर मिळेल. इथे तुम्हाला डिलिट झालेले फोटो आणि व्हिडिओ दिसतील. यानंतर हव्या असणाऱ्या फोटोज आणि व्हिडिओजची निवड करा. यानंतर रिस्टोर या पर्यायावर क्लिक करा. यानंतर तुम्ही फोटो आणि व्हिडिओ रिकव्हर करू शकता.


## स्मार्ट ट्रिक्स

### अशी सुधारा चूक

जीमेलवरून मेल पाठवताना घाईगडबडीत भलत्याच ई मेल आयडीवर मेल गेली तर काय करायचं? अजिबात काळजी करायची नाही. जी मेलमधल्या एका फीचरमुळे तुम्हाला ही मेल डिलिट करता येईल. तुमचं जी मेल खातं ओपन करा. इथे उजव्या बाजूला सेटिंग्जचा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर 'अन डू सेंड' हा पर्याय दिसेल. इथे मेल कॅन्सल करण्याची वेळ दिलेली दिसेल. तुम्ही वेळ नोंदवू शकता. यानंतर हे फीचर ॲक्टिवेट होईल. यानंतर तुम्ही ई मेल सेंड केल्यानंतर खाली 'अन डू'चा पर्याय दिसेल. चुकीची मेल गेल्याचं लक्षात आल्यावर तुम्ही 'अन डू' करून चूक सुधारू शकता.

# पर्याय 'कॉन्सेप्ट स्टोअर'चा

सध्या ऑनलाईन शॉपिंगचा बोलबाला आहे. विविध ऑनलाईन साईट्स ग्राहकांवर सवलतींची खैरात करतात. मोबाईल फोनसह विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किंमतीत मिळतात. अशा ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे दुकानदारांपुढे बरीच आव्हानं उभी राहिली. तरुण मंडळी ऑनलाईन खरेदी करत असली तरी अनेकांना वस्तू प्रत्यक्ष बघून, स्पर्श करून खरेदी करायला आवडतं. सध्याच्या तीव्र स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी दुकानदारही वेगवेगळे फंडे लढवत असतात. त्यातूनच कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना उदयाला आली आहे. या कॉन्सेप्ट स्टोअरच्या माध्यमातून तुम्हीही उद्योजक बनू शकता. याबाबतचं मार्गदर्शन...



कॉन्सेप्ट स्टोअर विशिष्ट संकल्पनेवर आधारित असतं. म्हणजे या स्टोअर्समध्ये ठराविक उत्पादनं विक्रीसाठी ठेवली जातात. काही दुकांनांमध्ये फक्त सौंदर्यप्रसाधनं मिळतात तर काहींमध्ये गृहोपयोगी वस्तू असतात. पुस्तकं, सजावटीच्या वस्तू अशा विविध संकल्पनांवर आधारित असणारी ही स्टोअर्स आता लोकप्रिय ठरत आहेत. ठराविक ग्राहकवर्ग समोर ठेऊन हे स्टोअर सुरू केलं जातं.

वेगळ्या वाटा

कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना तशी नवी आहे. त्यामुळे हा प्रकार लोकप्रिय होईपर्यंत थोडं थांबावं लागेल. दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअर्स नेहमीच्या दुकानांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. ही स्टोअर्स ग्राहकांना आपल्याशी जोडून घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्याशी जोडलेली रहातात. त्यामुळे कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करताना ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअरमध्ये विविध ब्रँड्सच्या उत्पादनांना स्थान द्या. कॉन्सेप्ट स्टोअरच्या रचनेकडे विशेष लक्ष द्या. त्यांची अंतर्गत रचना स्टोअरच्या थीमला तसंच विक्रीसाठी ठेवलेल्या उत्पादनांना साजेशी असायला हवी. यासोबत ग्राहकांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न करावा.



# स्टायलिश मँडरिन कॉलर

दोस्तांनो, तुम्ही वॉर्डरॉब अपडेट करायच्या विचारात असाल तर वैशिष्ट्यपूर्ण शर्टसची खरेदी करू शकता. त्यातही मँडरिन म्हणजेच बँड कॉलरचे शर्ट विकत घेता येतील. मँडरिन कॉलर ही पूर्व आशियाई देशांमधली स्टाईल आहे. पण यामुळे तुम्हाला हटके लूक मिळू शकतो. मँडरिन कॉलर शर्ट कॅरी करण्याच्या या काही टिप्स...

✻ सहकाऱ्यांसोबत संध्याकाळी बाहेर जाताना काय घालायचं असा प्रश्न पडला असेल तर मँडरिन कॉलर शर्ट हा बेस्ट ऑप्शन आहे. सौम्य रंगाचा मँडरिन शर्ट, ब्लेझर आणि मॅचिंग स्कीनी ट्राउझर हा मस्त पेहराव ठरू शकेल. त्यावर मॉक्केसिन शूज घालता येतील. या शर्टवर बंदगळा किंवा नेहरु जॅकेटही घालता येईल. पण या शर्टवर टाय लावू नका.

✻ कॅज्युअल ऑकेजनसाठी गडद रंगाचा मँडरिन शर्ट निवडा. एखाद्या शॉर्टसवर हा शर्ट घाला. तुम्ही सस्पेंडर लूकही कॅरी करू शकता. त्यावर मस्तपैकी स्नीकर्स घाला आणि कॅज्युअल आउटिंगला तयार व्हा.

फॅशन पॅशन

✻ ट्रॅडिशनल लूकसाठी मँडरिन कॉलरवाला कुर्ता ट्राय करा. चेक्स किंवा स्ट्राईप्सऐवजी हटके प्रिंट्सची निवड करा. या कुर्त्यासोबत स्कीनी जीन्सही घालता येईल. कोल्हापुरी चप्पलने तुम्हाला एथनिक लूक मिळेल.

# ती हवी आहे...

गेल्या सहा महिन्यांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. तिच्या आणि माझ्या आईवडिलांना आमच्या नात्याबद्दल कल्पना आहे. पण गेल्या काही दिवसांपासून माझी मैत्रीण खूपच विचित्र वागते आहे. तिच्या आईवडिलांना आमचं हे नातं पसंत नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती याचं कारणही सांगायला तयार नाही. मी तिच्या पालकांशी बोलायला तयार आहे. पण ती याबद्दल काहीच बोलत नाही. आता मी काय करू? मला तिला गमवायचं नाही.




**उत्तर :** मित्रा, सध्या तू विचित्र परिस्थितीत अडकला आहेस. खरं तर तुझ्या मैत्रिणीने तिच्या पालकांच्या मनातलं जाणून घ्यायला हवं. त्यांच्या मनात तुझ्याबद्दल नेमकं काय आहे, न भेटताच ते तुला का नाकारत आहेत हे तिला कळायला हवं. आधी तिच्या पालकांचं म्हणणं ऐकून घ्या. मग तुम्ही दोघं बोला आणि पुढे काय करायचं हे ठरवा. तुम्ही दोघांनीही शांत रहाणं गरजेचं आहे. अजिबात गोंधळून जाऊ नका. काहीतरी मार्ग नक्कीच निघेल.

मॅच मेकिंग

# सैर करा बूंदीची

राजस्थानमध्ये गेल्यावर जयपूर, उदयपूर, जैसलमेर, जोधपूर अशा शहरांची सैर केली जाते. मात्र या राज्यात सुंदर आणि नयनरम्य अशी बरीच ठिकाणं आहेत. त्यापैकी एक ठिकाण म्हणजे बूंदी.

बूंदी शहराच्या सभोवताली अरवली पर्वतारांगा आहेत. या पर्वतारांगांच्या मधोमध वसलेलं बुंदी आपल्याला आकर्षित करतं. राजस्थानातली बरीचशी शहरं किल्ले आणि महालांसाठी प्रसिद्ध आहेत. पण बूंदी खास चित्रकलेसाठी ओळखलं जातं. इथल्या चित्रकलेला खूप प्राचीन इतिहास आहे. कलेची आवड असणाऱ्यांना इथे सुंदर अशा चित्रकृती बघता येतील.



बूंदीमध्ये किल्लेही आहेत. इथला एक किल्ला दोन भागांमध्ये विभागला गेला आहे. या किल्ल्याचा वरचा भाग तारागड म्हणून ओळखला जातो आणि खालच्या भागाला फक्त गड असं म्हणतात. १२४२ मध्ये राव देवाजीने या शहराची स्थापना केली. बूंदा मीणा या सरदाराच्या नावावरून या शहराला बूंदी हे नाव पडल्याचं म्हटलं जातं. या शहरातलं हाथी पोल हे द्वार भव्यतेचं प्रतीक आहे. हे द्वार स्थापत्यकलेचा उत्तम नमुनाही आहे. हे द्वार बूंदीतलं एक खास आकर्षण आहे.

भटकंती

पावसाळ्यात या शहराचं सौंदर्य अधिकच खुलतं. नोव्हेंबर-डिसेंबरमध्येही इथे जाता येईल. कोटा शहरापासून बूंदी फक्त ३५ किलोमीटरवर आहे. साधारण तासाभरात कोटाहून बूंदीला जाता येईल. त्यामुळे राजस्थानला गेल्यावर बूंदीची सैर नक्की करा.

## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

आज पर्व पर्युषणचा तिसरा दिवस आहे. हे दिवस असे लवकर जातात कि कळतसुद्धा नाही. धर्म साधनेत मनुष्य असे लागले आहे, कि जो तो आपल्या कर्माची निर्जरा आपल्या परीने करतो, पण? आज प्रश्न आहे की सर्व जण स्थानकात येतात? आपल्या कर्माची निर्जरा करतात, मुलांना, मुलींना ह्या आठ दिवसाचे महत्त्व सांगतात. सर्वजण धर्म आराधना करण्यास मंदिरात येतात? काहींचे होय तर काहींचे नाही असे उत्तर आहे का? तर 'संस्कार' आजचा विषय आहे. आज आपली पिढी कोठे आहे? कोठे चालली आहे? काय करते?

आज पर्व पर्युषणच्या पावन दिवशी आपण आपल्या धर्माचे महत्त्व आपल्या पाल्यांना सांगणे फार गरजेचे आहे. संस्कार आणि शिक्षण मध्ये थोडे अंतर आहे. शिक्षा प्राप्त व्यक्ति शिक्षित व विद्वान असतो. पिता द्वारा खास करून माताकडून जे संस्कार दिले जाते ते न मिटणारे व स्थायी असते, कि मृत्यूपर्यंत त्याच्या जीवनाची दिशा दाखवतात.

जसे :- बालक ध्रुव वर आई सुगतिचे असे संस्कार होते कि ध्रुव अमर झाला. शिवाजी छत्रपती वीर आणि देशभक्त बनण्याचे श्रेय माता जिजाबाईला आहे. शंभर शिक्षक देखील एका बालकाला तेवढे चांगले संस्कार देवू शकत नाही. जेवढे चांगले आणि स्थायी संस्कार एक आई देवू शकते. आईची ममता ही वंदनीय आहे. परंतु जेवढे आई संस्कार लावते तेवढेच तिचे प्रेम कधी कधी बिघडवते. मुल अज्ञान व्यक्ति बरोबर राहिला तर तो अज्ञानच राहतो आणि जर हुशार व्यक्ति बरोबर राहिला तर तो हुशारच होईल. मनुष्य ज्याच्या बरोबर राहील तसेच गुण अंगीकारेल स्वीकारेल. ह्यासाठी संगतीचा प्रभाव फार असतो. संस्कार आणि असंस्कार यात फरक समझता आला पाहिजे. एक कथाद्वारे बघू.

नंदी नावाचा व्यक्ति तो आपल्या जीवनाला फार कंटाळलेला असतो, कारण फार प्रयत्न करूनसुद्धा तो गरिबच राहतो. त्याच्या मनात आत्महत्या करण्याचा विचार येतो. सर्व जंगलात जातो व तेथील पहाड वर चढतो व उडी मारणारच तेवढ्यात त्याच्या मनात येते कि मी मेलोच नाही किंवा मेलो तर माझ्या कुटुंबाचे काय होईल? त्याला त्याचे भय खाऊ लागले, पण तेथे गुरू आपल्या शिष्यांना काही ज्ञान देत होते. तेव्हा त्यांनी त्या नंदीला पाहिले व त्याला खाली आणले व त्याला धिर देत त्याचे मन वळवले. ह्याचाच अर्थ गुरु बरोबर राहिल्यास जीवन चांगले होते.

महाभारतात कुंतीने अर्जुनला संस्कार दिले, म्हणूनच त्याच्याबरोबर श्रीकृष्ण होता व युद्ध जिंकला. पण हेच मामा शकुनीने आपल्या भाच्यांना वाईट संस्कार दिले म्हणूनच दुर्योधन हा हारला. सर्व काही असून तो हारला व अर्जुन सर्व काही हारून तो जिंकला. म्हणूनच संस्कार फार महत्त्वाचे आहे.

– सौ. सविता चोरडिया

## सनातन धर्म संस्कृतीचे रक्षण हे प्रत्येक हिंदूंचे कर्तव्य आहे

### माधवी लता यांचे प्रतिपादन



पंडित दिनदयाळ पतसंस्था, पंडित दिनदयाळ परिवार आयोजित पंडित दिनदयाळ व्याख्यानमालेत विचार पुष्प गुंफताना श्रीमती माधवी लता. समोर उपस्थित जनसमुदाय.

नगर – महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत छत्रपती शिवरायांचा जन्म झाला आहे. महान योद्धाला जन्म देणारी राजमाता जिजाऊंची कुस येथे आहे. छत्रपती शिवरायांचा जन्म आंध्र प्रदेशात का झाला नाही? म्हणून आम्ही नाराज आहोत. परंतु छत्रपती शिवराय हे अखंड हिंदुस्थानचे दैवत आहे. असे मला वाटते. कश्मीर ते कन्याकुमारी, कटक ते कटक अखंड भारतात ऊर्जा देणारे छत्रपती शिवरायांचे कार्य आहे. सनातन हिंदू धर्म हा खूप प्राचीन आहे. सप्त महार्षींच्या आधीपासून सनातन धर्म असल्याने आधी अनंत काळापासून आहे. हिंदू धर्मातील लोक सनातन काय आहे. हे विसरले आहेत. मातृ पितृ देवो भवआई वडील हे आपले देव आहेत. तसेच सर्व वडीलधाऱ्यांचा सन्मान करणे ही आपली हिंदू संस्कृती आहे, असे माधवी लता म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या, पूर्वी गावातील मंडळी सायंकाळी मंदिरात जमत होती. मंदिरात होम हवन, धर्मसंस्कार, भजन, नृत्य कला, संस्कृती असे अनेक कार्यक्रम होत होते. सर्व गावातील मंडळी गावातील समस्येसाठी विचार मंथन करीत होती. राजा वेश परिधान करून गावकऱ्यांची चर्चा ऐकत होता. मंदिरात जाणे सोडल्याने हिंदू धर्माविषयाची माहिती नवीन पिढीला नसल्याने हिंदू संस्कृती लयास गेली आहे.

भारत देशात विदेशी आक्रमणानंतर सुशील व बुद्धिशाली महिलांवर आक्रमणकर्त्यांची वाईट नजर पडली. भारतीय स्त्रियांना संरक्षणासाठी चार भिंती टाकण्यात आले. सनातन धर्मातील स्त्री ही शक्तिशाली नारी होती. महिषासुराचा वध हा माता पार्वतीने केला आहे. सनातन धर्मात महिलांना मानाचे स्थान होते. राजाच्या शेजारी बसून राणीने राज्यकारभार सांभाळला होता. परंतु आज देशात परधर्मीयांकडून मुलींवर होणारे अत्याचार व संरक्षणाचा विषय गंभीर बनला आहे. घरातील माता, पिता व भाऊ यांनी मुलींचे संरक्षण केले. तर त्या सुरक्षित राहतील. मुलगी म्हणजे गुलाब आहे तर काटे म्हणजे आई-वडील आहेत. जर कोणी गुलाबाला तोडण्याचा प्रयत्न केला. तर मात्यापित्यांकडून त्यांना विरोध होईल. परंतु मुलींनी आई- वडिलांना काटे समजू नये. त्यांनी केलेले संस्कार विसरू नयेत.

### पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेस नगरकरांची गर्दी

देशात १२० करोड हिंदू असताना १७ कोटी लोक महिलांवर अत्याचार करीत आहेत. ही मोठी चिंतेची बाब आहे. हिंदूंनो जागृत व्हा संघटीत व्हा. हा देश तुमचा आहे. जो कोणी हिंदुत्वासाठी लढेल तो चुकला तरी आपलाच आहे. येणाऱ्या निवडणुकीत सनातन हिंदूंनी हिंदुत्वाच्या विचाराला जो पुढे नेईल त्यांना निवडणुकीत निवडून आणावे.

छत्रपती शिवाजी महाराज दुसऱ्या घरात जन्माला येवो. ही धारणा चुकीची आहे.प्रत्येक घराघरात राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय, झाशीची राणी, अहिल्यादेवी होळकर जन्माला आल्यास हिंदू धर्म सशक्त होईल. सनातन धर्म संस्कृतीचे रक्षण हे प्रत्येक हिंदूंचे कर्तव्य आहे. असे प्रतिपादन हैदराबाद येथील प्रखर हिंदुत्ववादी विचारांचे वक्ते माधवी लता यांनी केले आहे.

सावेडी माऊली सभागृह येथे पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे तिसऱ्या पुष्पाचे उद्घाटन स्नेहालयाचे संघटक गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तिथीप्रमाणे होणाऱ्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी हैदराबाद येथील हिंदुत्ववादी विचारांच्या प्रखर वक्ते श्रीमती माधवी लता, पतसंस्थेचे संस्थापक तथा भाजपचे प्रदेश सदस्य वसंत लोढा, अभय आगरकर, भानुदास बेरड, दिलीप सातपुते, बाबासाहेब सानप, अशोक कानडे, पतसंस्थेचे मानद सचिव विकास पाथरकर, संचालक मिलिंद गंधे, बाबासाहेब साठे, शैलेंद्र चंदे, शारदा होशिंग, शैला चंगेडे, संदेश लोढा, प्रतिष्ठानचे अध्यक्ष धनंजय तागडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, राजकुमार जोशी, विवेक नाईक, सुरज अग्रवाल, रुद्रेश अंबाडे, अभिषेक दायमा, बंटी डापसे, त्रिलेश येनगंदुल, संजय वल्लाकट्टी, नरेंद्र सोत्री, लता लोढा, सौ.अनिता आगरकर, सौ.सुनंदा भुजबळ, गीता गिल्डा आदी उपस्थित होते.

गिरीश कुलकर्णी म्हणाले, आज देशात अस्वस्थ करणारी सामाजिक परिस्थिती निर्माण आहे. देशात कट्टरता, धर्मांतरण व लव्ह जिहाद ही मोठी आव्हाने आहेत. दरवर्षी पंधरा लाख मुलींची गर्भातच हत्या होत आहे. दोन हजार मुली व महिलांची तस्करी परदेशात केली जाते. दररोज ९३ बलात्कार होत आहेत. देह व्यापारात ५५ लाख महिलांचा समावेश आहे. यापैकी ३२ टक्के अल्पवयीन मुलींचा वापर देहव्यापारात केला जात आहे. ही मोठी चिंताजनक बाब आहे. हिमाचल सरकारने मुलीच्या लग्नाचे वय १८ वर्ष होते. ते आता २१वर्ष असे वाढवले आहे. यामुळे देशात मोठी समस्या निर्माण होणार आहे. यामुळे सोळा-सतरा वयात होणाऱ्या बालमातांची संख्या वाढत आहे. सामाजिक व्यवस्था धोक्यात आली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महर्षी सरस्वती यांनी सांगितले आहे की जोपर्यंत आंतरजातीय विवाहास समाज मान्यता देत नाही. तोपर्यंत समाज सशक्त होणार नाही. सामाजिक विचारांचे मंथन, धार्मिक, नीतिमान देशभक्त समाज निर्मितीसाठी व्याख्यानमालेचा उपक्रम कौतुकास्पद आहे.

या कार्यक्रमात श्रीमती माधवी लता यांचा पद्मशाली समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या वतीने पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

कार्यक्रमाचे स्वागत मिलिंद गंधे यांनी केले. सूत्रसंचालन संचालिका शारदा होशिंग यांनी केले. तर आभार शैलैश चंदे यांनी मानले. व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवशी नगरकरांनी मोठी गर्दी केली होती.

## हॉस्पिटलचे पार्किंगमधून दुचाकीची चोरी

नगर –शहरातील आनंदऋषीजी हॉस्पिटलचे पाठीमागील पार्किंग मध्ये लावलेली होंडा कंपनीची मोपेड (क्रं.एम.एच.१६ ए एन ८१५) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत दीपक बंकटलाल बरमेचा (रा.अंबिका विद्यालयासमोर, केडगाव) यांनी सोमवारी (दि.२) कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०५ (बी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## अवैद्य धंद्यांचा सुळसुळाट, कारवाई करा अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण



नगर – पोलिसांचे होत असलेले दुर्लक्षपणामुळे मोठ्या प्रमाणात अवैद्य धंद्यांचा सुळसुळाट चालू आहे. सोलापूर रोड येथील वाकोडी फाटा व दरेवाडी परिसराम ध्ये दारू, मटका, बिंगो, जुगार, गांजा अशा अनेक प्रकारचे धंदे राजरोसपणे चालू आहे. या अवैध धंद्यामुळे रोज कमावणारा व्यक्ती व घरातील कर्ता पुरुष व युवक हा व्यसनाच्या आहारी जात असून युवक हा मोठ्या प्रमाणात बिंगो जुगाराच्या आहारी गेल्याने कुटुंबाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने या अवैध धंद्यांविषयी अनेकदा नागरिकांनी आवाज उठविला आहे मात्र कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही व हे धंदे बंद होत नाही. वाकोडी फाटा व दरेवाडी परिसरातील अवैद्य धंदे बंद करण्यात यावे अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयावर स्थानिक नागरिक येऊन आमरण उपोषण करणार आहोत. या प्रश्नावर लवकरच खासदार निलेश लंके यांची भेट घेऊन गावातील संपूर्ण अवैद्य धंदे त्यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे सोनू साबळे यांनी सांगितले.

## दुचाकीच्या डिक्कीतून ३ लाखांची रोकड पळविली

### वसंत टेकडी परिसरातील घटना; अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

नगर – बँकेतून काढून दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेली ३ लाखांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना वसंत टेकडी परिसरातील वीर सावरकर मार्ग वरील एका किराणा दुकानासमोर सोमवारी (दि. २) दुपारी १ ते १.३० या कालावधीत घडली.

याबाबत शिवाजी लक्ष्मण तांबे (वय ६४, रा. वीर सावरकर मार्ग, वसंत टेकडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी तांबे यांनी सोमवारी दुपारी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या गुलमोहर रोड शाखेतून ३ लाखांची रक्कम काढली होती. ती त्यांनी त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवली. दुचाकी घेवून ते वीर सावरकर मार्ग येथील घरी जात असताना घराजवळ असलेल्या महेश किराणा दुकानासमोर त्यांनी दुचाकी उभी केली व ते दुकानात गेले होते.

त्यावेळी अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीचे लॉक तोडून त्यात ठेवलेली ३ लाखांची रोकड चोरून नेली. काही वेळाने फिर्यादी तांबे यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी आजूबाजूला चौकशी केली. मात्र काहीच माहिती मिळाली नाही. त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## धमकी देणारे भाषण करुन दोन समाजात जातीय तेढ निर्माण केल्याने नितेश राणे व सभेच्या आयोजकांवर गुन्हे दाखल करुन कारवाई करा



भाजपचे आमदार नितेश राणे यांनी अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाला धमकी देणारे भाषण करुन दोन समाजात जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने चिथावणी दिल्याप्रकरणी त्यांच्यावर व सभेच्या आयोजकांवर गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन निवेदन दिले.

### जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – भाजपचे आमदार नितेश राणे यांनी अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाला धमकी देणारे भाषण करुन दोन समाजात जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने चिथावणी दिल्याप्रकरणी त्यांच्यावर व सभेच्या आयोजकांवर गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन निवेदन दिले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष हनीफ शेख, शहर जिल्हा महासचिव अमर निरभवणे, शहर उपाध्यक्ष अजीम शेख, उपाध्यक्ष प्रवीण ओरे, मनोहर जिंदम, सिसिल भक्त, आबेद शेख, अक्षय शिंदे, जोसेफ शिरसाट, राजू भिंगारदिवे, बबलू मकासरे, सुरेश पानपाटील, संजय शिंदे, मुजाहिद शेख, साहिल शेख, सिद्धार्थ पवार, पिनू भोसले आदी उपस्थित होते.

शहरात महंत रामगिरी महाराज यांना समर्थन देण्यासाठी शहरातून रविवारी (दि.१ सप्टेंबर) आमदार नितेश राणे यांनी रॅली काढून दिल्लीगेट येथे सभा घेतली. या सभेत त्यांनी मुस्लिम समाजाला मशिदीत घुसून मारण्याच्या धमक्या देणारे वक्तव्य केले. त्यांच्या भाषणाने संपूर्ण मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. अल्पसंख्याक मुस्लिम समाजाबद्दल नेहमी चिथावणीखोर भाषण करुन धार्मिक द्वेष पसरविण्याचे काम ते करत आहे. संविधान व लोकशाहीवर घाला घालण्याचे काम ते सातत्याने करत असून, भडकाऊ भाषणाने शहरातील जातीय सलोखा बिघडविण्याचे काम करत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

याप्रकरणी नितेश राणे व आयोजकांवर गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करावी व यापुढे समाजात जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने सभा अथवा मोर्चे काढणाऱ्यांना परवानगी देऊ नये, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.



## चेंबर दुरुस्ती करावा

तोफखाना भागातील वाऊत्रे बिल्डिंग जवळ काळभैरव मंदिर रोड भराडगल्ली येथे चेंबर दुरुस्ती करावी. पावसाळ्याचे दिवस चालू आहेत. पाऊस आला तर हा चेंबर दिसणार नाही त्यामुळे दुर्घटना होऊ शकते. लवकरात लवकर नवीन झाकण बसवावे अशी मागणी ऋषिकेश गुंडला यांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे.

## मनपाचा नगर रचना व अतिक्रमण विभाग बंद करावा

### वर्षानुवर्षे कारवाई होत नसल्याने भूमाफीया बोगस गुंठेवारी व लेआऊट प्रकरणे वाढली

नगर – शहरातील वाढते भूमाफीयांचे अतिक्रमण प्रकरणाच्या मुळाशी जिल्हा प्रशासन व म.न.पा च्या नगर रचना व अतिक्रमण विभागाची विवादीत कार्यपद्धती सिद्ध होत आहे. नगर रचना विभागाने पारित केलेले बोगस गुंठेवारी, बोगस लेआऊट व अन्य तक्रारीवर लोकायुक्त न्यायालय व प्रशासकांनी अतिक्रमण हटविण्याच्या निर्देशास सदर विभागाने केराची टोपली दाखवली. जिल्हा व म.न.पा प्रशासनात दप्तर दिरंगाई चालू आहे. उलट सदर विभागास अतिक्रमण धारकांकडून हफ्ते व लाच घेतली जाते.

हॉटेल धारकाविरुद्ध अतिक्रमण तक्रार असेल तर विनामूल्य भोजन प्रशासनास मिळते. हॉस्पिटल विरुद्ध तक्रार असेल तर विनामूल्य उपचार मिळतो. याच धर्तीवर अतिक्रमण धारकाच्या व्यवसाय, पद व ऐपतीप्रमाणे प्रशासनास कारवाई टाळण्यासाठी हप्ता व लाच सदर विभागास मिळते. अपवाद प्रशासनाच्या संबंधांमधील अतिक्रमणधारक, राजकीय पदाधिकारी व त्यांचे समर्थक कार्यकर्ते, भूमाफीया यांना सुट मिळते अशी चर्चा आहे.

मनपातील नगर विभागातील अधिकारी व कर्मचारीवर्ग नगर विकास खात्यातील नियमानुसार गुंठेवारी व बांधकाम परवानगी प्रकरणे पारीत करीत नाहीत. उदा. सुडके मळा भागातील भू माफियांचे शिव पाणंद रस्त्यावरील अनाधिकृत अतिक्रमण हटवत नाहीत. परीणामी बोगस वहिवाटी रस्ते नोंद, बोगस गुंठेवारी व ले आउट प्रकरणे भूमी अभिलेख कडील अधिकृत क्षेत्रांप्रमाणे नोंद व संलग्न मूळ नकाशाविना गुंठेवारी परवानगी प्रकरणे मंजूर झालीत. ज्यायोगे लगत क्षेत्र धारकास चुकीचे वहिवाटी रस्ते व हद्द निर्माण होणे सारखे कायमच वादातीत प्रश्न निर्माण होतील. या सारखीच अनेक वादग्रस्त बांधकाम परवानगी प्रकरणे मनपा प्रशासनाने मंजूर केले. या विरुद्ध तक्रार दारच्या तक्रारीदाराच्या तक्रारीवर कारवाई होत नसल्याने मनपा नगर रचना व अतिक्रमण विभाग बंद करावा अशी मागणी संतोष सुडके यांनी केली आहे.

## स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ५ सप्टेंबर रोजी पुरस्कारांचे वितरण

### उमेश घेवरीकर, रजिया मुसा दफेदार शेख, सविता बेल्हेकर आदर्श शिक्षक तर संगीता सानप आदर्श कर्मचारी






नगर – स्नेहालय इंग्लिश मीडियम शाळेमध्ये शिक्षक दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ५ सप्टेंबर रोजी स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूल, एम.आय.डी.सी या ठिकाणी सकाळी १०.३० वाजता पुरस्कार वितरण होईल.

या वर्षी इंदिरा शामकांत मोरे पुरस्कृत स्व. शोभा महादेव कुलकर्णी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्हास्तरावरून पर्यवेक्षक, पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल, शेवगाव येथील उमेश घेवरीकर, स्नेहालय बालभवन प्रकल्पातून सौ. रजिया दाफेदार, स्नेहालय इंग्लिश मिडीयम मधून सविता बेल्हेकर निवड करण्यात आली.

स्व. प्रा. गोपालभाई गुजर यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या आदर्श कर्मचारी पुरस्कारासाठी स्नेहालय संस्थेतील जनसंपर्क विभागाच्या एक्झिक्युटिव्ह कु. संगीता गहीनाथ सानप यांची निवड करण्यात आली आहे.

अभंग प्रतिष्ठान इंग्लिश मिडीयम शाळा देहू येथील विकास कंद हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. संस्थेचे विश्वस्त पालक किरीटी मोरे यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण केले जाणार असल्याचे निवड समितीचे सदस्य व स्नेहालयाचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, शाळेचे संचालक राजेंद्र शुक्रे, संचालक हनिफ शेख व मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांनी सांगितले.

अहमदनगर जिल्हा व शहरातील शिक्षक व नागरिकांनी पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन स्नेहालयाचे अध्यक्ष जयाताई जोगदंड व सचिव डॉ.प्रीती भोंबे यांनी केले आहे.

## बसस्थानकातून महिलेच्या सोन्याच्या मिनी गंठणची चोरी

नगर – येथील माळीवाडा बस स्थानकावरून महिलेच्या गळ्यातील १७ ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण अज्ञात चोरट्याने चोरले. शनिवारी (दि.३१) सकाळी साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत मनिषा दिलीप दराडे (वय ४४, रा. आकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर, हल्ली रा. पागोरी पिंपळगाव, ता. पाथर्डी) यांनी फिर्याद दिली आहे. त्या शनिवारी सकाळी माळीवाडा बस स्थानकावर असताना साडेनऊच्या सुमारास अज्ञात चोरट्याने त्यांच्याकडील १७ ग्रॅमचे मिनी गंठण चोरले. सदरचा प्रकार फिर्यादीच्या लक्षात आल्यावर त्यांनी कोतवाली पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल केला आहे.



### भनसाळी टिव्हिएसमध्ये नवीन टिव्हिएस ज्युपीटर ११३.३ सीसी गाडीचे अनावरण

नगर मधील भनसाळी टिव्हिएस येथे नवीन टिव्हिएस ज्युपीटर ११३.३ सीसी गाडीचे डिवायएसपी अहमदनगर शहर महाराष्ट्र पोलिस अमोल भारती यांच्या हस्ते अनावरण करण्यात आला. ही गाडी नक्कीच सर्व ग्राहकांच्या पसंतीस उतरेल अशी आशा भनसाळी टिव्हिएसचे डायरेक्टर अभिनंदन भनसाळी यानी व्यक्त केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## कामगार पाहिजे
वाळकी ता.नगर येथील पेट्रोलपंपावर कामासाठी महिला कामगार पाहिजे
**9421588875**

नामांकित टाईल्सच्या शोरुममध्ये कामासाठी अनुभवी
## अकौंटंट पाहिजेत
महिला/पुरुष
आकर्षक पगार
न्यु डि-मार्ट शेजारी, बंधन लॉन समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर.
**9822243434**

## घरगुती कामासाठी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
(रिटायर्ड एस.टी.ड्रायव्हरला प्राधान्य)
**9890050040**

## पाहिजेत
फ्लेक्स मशिन ऑपरेटर (जागा २)
अनुभवींना प्राधान्य
सुबोध फ्लेक्स प्रिंटींग
तुळजा भवानी मंदिरासमोर, गौरी घुमट, आनंदी बाजार, अ.नगर.
Mob. 92 26 710 110

## पाहिजेत
रिकव्हरी (कलेक्शन) साठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे - जागा ०१
सेल्समन (मार्केटिंग)
करण्यासाठी मुले पाहिजेत जागा ०२
- संपर्क -
अभय सेल्स कॉर्पोरेशन. ॲण्ड हार्डवेअर
गजानन हॉस्पिटल शेजारी, सातभाई मळा, दिल्लीगेट, अ.नगर
**9145008009**

## प्लायवुड/हार्डवेअर शोरुमसाठी पाहिजेत
मॅनेजर : ०२
रिसेप्शनिस्ट : ०१ (महिला/पुरुष)
अकाऊंटंट : ०१ (महिला/पुरुष)
सत्यम हार्डवेअर
जुना बाजार, अ.नगर
**9595666000**
(वेळ : १०.३० ते ८.००)

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
## त्वरित पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर कम कॅशिअर - ०१
टॅलीज्ञान आवश्यक (१ ते २ वर्षाचा अनुभव)
सेल्समन/सेल्सगर्ल - ०५ (१ ते २ वर्षाचा अनुभव, पार्ट/फुल टाईम)
हेल्पर - ०२
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES
One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar

## चोवीहार (ब्याळू) हाउस
पावन पर्युषण पर्व निमित्त
चोवीहार की व्यवस्था की गई है
रविवार दि.०१/०९/२०२४ से
शनिवार दि.०७/०९/२०२४ तक
समय : शाम ५ बजे से ६.३० बजे
स्थानक : महेश मंगल कार्यालय,
बन्सी महाराज मिठाई के पास, रामचंद्र खुंट, अहमदनगर
**आनंद गुरु परिवार**

॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री रेणुकामाता प्रसन्न ॥
CARING FOR YOUR HEALTH
SHREE ANAND CLINIC
## श्री आनंद क्लिनिक
उद्घाटन सोहळा
बुधवार दि. ०४/०९/२०२४ रोजी
सायं. ६.०० वाजता
आयोजित केला आहे तरी, याप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
- आपले विनीत -
डॉ. प्रतिक चंद्रकांत कस्तुरे (BAMS,MS,GEN SURGERY (SCH) PGDEMS.)
डॉ. श्रध्दा प्रतिक कस्तुरे (BDS, CC IN CONTEMPORORY ENDODONTICS)
श्री. चंद्रकांत गणेश कस्तुरे
सौ. चारूलता चंद्रकांत कस्तुरे
श्री. प्रकाश नाथा धोत्रे
श्री. तन्मय अनिल बनकर
सौ. प्रतिक्षा तन्मय बनकर
**समस्त कस्तुरे परिवार**
आपल्या आगमनापर्यंत प्रतिक्षेत...
सौजन्य - श्री आनंद महिला स्वयं सहाय्यता संस्था, अध्यक्ष
पत्ता : शॉप नं. ६, जे एल पी बिझनेस टॉवर, लिंक रोड, केडगाव, अ,नगर - ४१४००५
7050022002

## पाईपलाईन रोड टच १८०० स्के. फूट
दुकान / शॉप, बँक, ऑफिस, पतसंस्था, हॉस्पिटल, सुपर शॉपी साठी भाड्याने देणे आहे.
**9923228111**

## गाळा भाड्याने देणे
भाजीपाला मार्केट मधील १२५ स्के.फु, गाळा भाड्याने देणे
**9422221946**

## विकणे आहे
१) दिल्लीगेट - साताळकर हॉस्पिटल जवळ १००० चौ. फूट प्लॉट असलेला तीन रूमचा बंगला
२) तपोवन रोडच्या मागे मोठा रस्ता असलेली ५३ गुंठे शेतजमीन
३) शेंडी गावामध्ये २४०० चौ. फूट एन. ए. प्लॉट
४) एकविरा चौक - पाईपलाईन रोड जवळ पहिल्या मजल्यावर रोड लगत वन बीएचके फ्लॅट
PRITHVI REAL ESTATE CONSULTANT
9225324755

॥ कुलस्वामिनी प्रसन्न ॥
## शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन


दररोज
- नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
- पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -भिस्तबाग चौक, झोपडी कॅन्टीन, तारकपूर, दिल्लीगेट, राज पॅलेस चौक, कायनेटिक चौक, केडगाव
पुणे ड्रॉप- वाघोली, खराडी बायपास, येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड, बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड, अ.नगर
9657746555/ 9226399555

## 1BHK फ्लॅट भाड्याने देणे
फ्लॅट आणि २ सिंगल रूम
पत्ताः गौरी घुमट, आनंदी बाजार, देवी मंदिराच्या मागे, अ.नगर
**9579530820**

## 2BHK फ्लॅट विकणे
जोशी हॉस्पिटल, गुलमोहोर रोड, पारिजात चौक,
**9834459834**

## 2 BHK रो-हौसिंग विकणे आहे व बुकींग सुरु

नगर-पुणे रोड हायवे, सर्व्हे नं. ५०९, केडगाव, एकनाथनगर, नेप्तीरोड येथे 2 BHK रो-हौसिंग उत्कृष्ट बांधकाम असलेले रेडि पझेशन रो-हौसिंग विकणे. (कर्ज सुविधा उपलब्ध)
स्वतःचे हक्काचे घराचे स्वप्न साकार करा...
संपर्क : **8149909086**

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

आमच्या पाठीवर सदैव मायेची थाप टाकणारे...! आमचे मार्गदर्शक
**मा.श्री. आसारामजी हरिभाऊ कावरे (आण्णा)**
(मा.नगरसेवक, म.न.पा., मा. संचालक, शहर बँक, अ.नगर)
यांना उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा !
- शुभेच्छुक - श्री स्वामी समर्थ मित्र मंडळ, अहमदनगर

## श्री गणेशाचं आगमन ढोल - ताशाच्या गजरात गुरु सुपरमार्केट ऑफर्सच्या जल्लोषात !
Guru PREMIUM DRY FRUITS

| | | | |
|---|---|---|---|
| बदाम कॅलिफोर्निया 250g MRP : ₹ 205/- OFFER ₹190/- | गोवा काजू 250g MRP : ₹ 290/- OFFER ₹260/- | प्रि.किशमिश 250g MRP : ₹ 100/- OFFER ₹85/- | रोस्टेड पिस्ता 250g MRP : ₹ 330/- OFFER ₹300/- |
| गुरु कलमी खजूर 500g MRP : ₹ 450/- OFFER ₹399/- | चारोळी बोल्ड 50g MRP : ₹ 150/- OFFER ₹130/- | मिक्स ड्रायफ्रूट 250g MRP : ₹ 250/- OFFER ₹220/- | पिवळी खारीक स्लाइस 250g MRP : ₹ 125/- OFFER ₹110/- |
| ग्रीन पिस्ता 50g MRP : ₹ 140/- OFFER ₹120/- | केशर 1.5g MRP : ₹ 225/- OFFER ₹149/- | सीडलेस खजूर 500g MRP : ₹ 135/- OFFER ₹75/- | अखरोट मगज 250g MRP : ₹ 449/- OFFER ₹275/- |

मोदक पीठ , बदाम स्लाइस , पिस्ता स्लाइस , खोबरा खिस
90+ VARIETY OF DRYFRUITS
* अटी व नियम लागू.
गुरु सुपरमार्केट
माऊली संकुल समोर
झोपडी कॅन्टीन मागे, अहमदनगर
फोन :०२४१-२४१७५७५
सोमवार बंद !


## डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
- चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
- पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
- डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
- सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
- सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

**अक्षय (गिते) हॉस्पिटल**
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

## VAISHNAVI TILES & TRADING CO.
- सर्व प्रकारच्या टाइल्स - ग्रॅनाइट - सॅनिटरी वेअर
- पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग - C.P. फिटिंग्ज

9590151515 | 9262515151
VARMORA TILES • BATHWARE, KERAKOLL The GreenBuilding Company, CARYSIL German Engineered, colortile, RAK CERAMICS, NIRALI, TIMEX, ICON
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर


## श्री. आसारामजी कावरे (आण्णा)
मा. नगरसेवक, मा.संचालक शहर बँक
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *

कुणाल कायगांवकर
E.G. कायगांवकर सोने, चांदी +१ ग्रॅम गोल्ड ज्वेलरी
सराफ बाजार, अ. नगर. Mo. 9970240280
अयुब खान, गौरव कायगांवकर, बबलूशेठ वर्मा, पंकज बुऱ्हाडे, सनी कायगांवकर, नंदूशेठ मुळे, पिंटु गायकवाड

रजि. नं. ए. एन. आर. (ए.एन.आर) आर. एस. आर. / (सी.आर.) दि. ५/४/१९९१
## श्री मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर.
### ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस सन २०२३-२०२४
* फक्त सभासदांसाठी विनम्र निवेदन *

**श्री. मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर.** या संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. १८/०९/२०२४ स. १०.३० वा. सुयोग मंगल कार्यालय, जुने कोर्टासमोर, अहमदनगर. येथे पतसंस्थेचे अध्यक्ष श्री कोडम नारायण विश्वनाथ यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर चर्चा करण्यासाठी होणार आहे. तरी सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

* सभेपुढील विषय *

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७/०९/२०२३ चे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) संस्थेचे सन २०२३ - २०२४ वर्षाच्या आर्थिकपत्रकांना मंजुरी देणे.
३) सन २०२३ - २०२४ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षक यांनी केलेल्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
४) सन २०२४ - २०२५ वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व मागील अंदाजपत्रकामधील ज्यादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६) सन २०२४- २०२५ या सालाकरीता पॅनलवरील वैधानिक लेखापरिक्षकाची वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्ती करणे.
७) सन २०२४- २०२५ या सालाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८) सन २०२२ - २०२३ या वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाच्या दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९) आर्थिक वर्षात थकीत कर्ज खात्यांना व्याजात दिलेल्या सुट रक्कमेस कार्योत्तर मंजुरी मिळण्याबाबत....
१०) सभासदत्व रद्द करण्याबाबत चर्चा करणे.
११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांच्या अनुपस्थितीस क्षमाचित करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार विनीमय करणे.

स्थळ - अहमदनगर
दिनांक - ०३/०९/२०२४

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**श्री. बोगा आशिष सुरेश**
(व्यवस्थापक)

* सुचना *

(१) पुरेशा गणसंख्ये अभावी (कोरम अभावी) सभा तहकुब झाल्यास तीच सभा त्याच दिवशी अर्धा तासाने सुरु करण्यात येईल व सभेचे कामकाज केले जाईल. या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही. (२) सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती, प्रश्न, सुचना मांडावयाच्या असतील तर सभेपूर्वी ५ दिवस अगोदर दि. १३/०९/२०२४ पर्यंत मिळतील अशा बेताने लेखी पाठवावे, त्यानंतर आलेल्या प्रश्नाबाबत विचार केला जाणार नाही. (३) सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांकडे रु.५००/- पेक्षा कमी शेअर्स आहे. त्यांनी ते रु.५००/- करुन घ्यावेत. तसेच सभासदांनी आपले शेअर्स सर्टीफिकेटस् व डिव्हीडंड संस्थेच्या मुख्यकार्यालयातुन घेवुन जावेत. ज्यांचे पत्ते बदलले असल्यास त्यांनी नवीन पत्ते संस्थेस कळवावे. (४) सभेस येतांना कृपया अहवालाची प्रत बरोबर आणावी.

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 30 ऑग. ते 06 सप्टें. 2024



| चित्रपट | वेळ |
|---|---|
| अहो विक्रमार्का (हिंदी) | 07:15 P.M. |
| खेल खेल मैं | 04:30 P.M. 10:00 P.M. |
| नेता गीता (मराठी) | 01:45 P.M. |
| स्त्री -२ | 8:00, 10:00 11:00 A.M., 1:00 1:55,PM 3:50, 4:45, 6:50, 7:40, 9:45, 10:00 PM |
| दि डायरी ऑफ वेस्ट बेंगॉल (हिंदी) | 11.00 PM |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow — CONNPLEX SMART THEATRE — AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

वाढलेल्या
## वजनाने त्रस्त आहात? वजन कमी करणे झाले सहज शक्य

**7020025541**

॥ श्री कुलस्वामीनी प्रसन्न ॥
गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
## श्री तिरुपती बालाजी
दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापूर महालक्ष्मी
सहल दि. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० नोव्हेंबर २०२४
बुकिंग दि. १५ जुलै पासुन सुरु (मर्यादित सिटस्)

* दर्शनीय स्थळे *
श्री तिरुपती बालाजी * पापनाशम * आकाशगंगा * स्वामी पादुका दर्शनम् * शिल तोरणम् * गोविंदराज स्वामी टेंम्पल * पद्मावती आम्मा टेंम्पल * श्री कपिलेश्वर स्वामी टेंम्पल * कोल्हापूर महालक्ष्मी
* प्रतिव्यक्ती *
₹ 6501/-
* समाविष्ट गोष्टी *
हॉटेल निवास (२, ३, ४ शेअरिंग) रुम्स, चहा, नाश्ता, रोज पाणी बॉटल २ (५०० मिली) शुध्द शाकाहारी जेवण दुपारचे व रात्रीचे जेवण, स्लिपर क्लास रेल्वे तिकिटस्, दर्शन पास
AMAR PREM Holidays & Multiple services
* ऑफिस *
नगर : मो. 9226399555 / 9657746555
पुणे : मो. 9168055159 / 9819927017
नाशिक : मो. 9822281125 / 8149324403
जालना : मो. 9595150999
कडा : मो. 7030034041 / 9423471413

॥ श्री ॥
## श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघ महावीर सांस्कृतिक भवन
आनंदऋषीजी हॉस्पिटल शेजारी, माणिकनगर, अहमदनगर ४१४००१
(महा) भारत. (०२४१) २३५ ८५७४, ९२१७२०२०२०
### फक्त सभासदांसाठी - नम्र सूचना
सन्माननीय सदस्य,
**श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ,**
अहमदनगर.

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता** संस्थेच्या अरणगांव रोड वरील **नियोजित श्री बडीसाजन सांस्कृतिक भवन, सुभद्रानगर, अरणगांव रोड, अहमदनगर** येथे मा. अध्यक्ष श्री. पेमराजजी बोथरा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व **सभासदांनी** उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेची विषय पत्रिका -**
१) समाजातील ज्ञात व अज्ञात निधन झालेल्या मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करणे.
२) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.
३) संस्थेचे वर्ष २०२२ - २०२३ व २०२३-२०२४ अखेर पर्यन्तची हिशोब पत्रके व ताळेबद मंजूर करणे.
४) पुढील आर्थिक वर्षाकरिता ऑडीटरची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
५) पुढील आर्थिक वर्षाचे उत्पन्नाचे व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी घेणे.
६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आलेल्या पत्रांचा विचार करणे व आयत्या वेळेस येणाऱ्या विषयांचा विचार विनीमय करणे.

**विशेष सुचना-**
१) गणपुर्ती अभावी सभा तहकुब करावी लागल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही. ज्या सभासदांना संस्थेचे तपासलेले ऑडिटेड बॅलन्स शीट, जमा - खर्चाचा तपशील पाहावयाचे असतील तर संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील.
२) ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांचा वेळेअभावी विचार करणे शक्य होणार नाही. म्हणून ज्या सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मिटींगच्या आधी ७ दिवस लेखी स्वरुपात कार्यालयात कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.

दि. ०१-०९-२०२४

सेक्रेटरी
**विशाल गुळचंद शेटीया**
श्री बडीसाजन ओसवाल श्री संघ, अ.नगर.

टिप - सभा संपल्यानंतर सुरुची भोजनाची व्यवस्था केली आहे. सभासदांनी त्याचा आस्वाद घ्यावा.

Career DISHA ke saath
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
**DCGA** Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY

- MS-OFFICE
- TALLY PRIME
- GST
- CORELDRAW
- ILLUSTRATOR
- PHOTOSHOP
- WEB PAGE DESIGNING
- BASIC HARDWARE

Duration : 6 Months
Delhi Gate Branch — 9371051769
Old ST stand Branch — 9371151769
Pipeline Branch — 7447761769